ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक !

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३६
वर्ष १४ अंक ८
वार्षिक वर्गणी ₹ १८०



राजस्थानी गीत

भलेरी रुत आयी म्हारा देस में

ओ कुण बीजे बाजरोये बदरी
ओ कुण बीजे मोठ मेवा मिसरी
सुरंगी रुत ऽऽ सुरंगी रुत आयी म्हारा देस में
भलेरी रुत आयी म्हारा देस में ।।धृ।।

हरिया हरिया खेत सुहाना
बाजर चढियों नि धान मोरा
सुरंगी रुत ऽऽ सुरंगी रुत आयी म्हारा देस में
भलेरी रुत आयी म्हारा देस में

कांकण में मौर्या नाचेला
कोयलडी म्हणे गीत सुनविला
सुरंगी रुत ऽऽ सुरंगी रुत आयी म्हारा देस में
भलेरी रुत आयी म्हारा देस में

(कविता संकेतस्थळावर ऐका.
कवितेचा अर्थ आतील पानावर)



मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्याचा भावार्थ
– भलेरी रुत आयी म्हारा देस में (राजस्थानी गीत)

हे बाजरीचे बी कोणी लावले? हे साखरेसारखे बाजरीचे गोड बी कोणी लावले? आनंदी ऋतू आज माझ्या देशात आले. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले. हिरवे हिरवे मनोहारी बाजरीचे शेत बहरूनी यावे. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले. रानावनात मोर नाचू लागला. कोकीळा गोड गीत गावू लागली. आनंदी ऋतू आज माझ्या देशात आले. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले.

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३६। वर्ष १४ अंक ८

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २६२ वा अंक, वर्ष २२ अंक १०

प्रकाशन दिनांक - सौर ११ वैशाख शके १९३६/१ मे २०१४

ॐ

***इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात***

• अंतरंग •

४. **संवाद** - महेन्द्र सेठिया

५. एकांकिका ...**ठेच लागल्याशिवाय...** - प्रकाश पारखी

१०. कविता... **खुर्ची** - मृदुला पाठक

११. ललित... **प्रतिमा उदंड झाल्या...** - किरण पुरंदरे

१४. वाचलेच पाहिजे असे काही...

महाराष्ट्रातील उद्योजक - प्रसाद वैद्य

इंद्रधनु - यशवंतराव लेले

१४. **विज्ञान प्रयोग..** - डॉ. कांचनगंगा गंधे

१७. माहितीपर... **चौसष्ट घरांचा विश्वसम्राट - विश्वनाथन् आनंद** - मिलिंद ढमढेरे

२०. ललित ... **ते चार शब्द...** - सुनील पाटील

२१. प्रेरणादायी... **लेह ते खारदुंग ला एक सायकल सफर!!** - मिलिंद कुलकर्णी

२४. कथा... **प्रतिसाद** - कविता मेहेंदळे

२८. चित्रपट रसास्वाद... **'यलो'** - चारुता परांजपे

३१. ललित... **छंद पक्षिनिरीक्षणाचा** - मेधा जोगदेव

३३. चिंतनपर... **'थ' थव्याचा !** - अरविंद भावे

३६. कविता...**खराखुरा मित्र** - एकनाथ आव्हाड

३७. संवाद कौशल्य...११

अर्थपूर्ण संवादासाठी - आश्लेषा महाजन

३९. कार्यानुभव... **सुट्टीतील वेगळा अनुभव**

४१. मुलांचे पान... **एक आगळा-वेगळा अनुभव** - चि. अर्चित देवधर

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **भलेरी रुत आयी म्हारा देस में** (राजस्थानी गीत)

याशिवाय - बौद्धीक खुराक (१०), मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पदयाचा भावार्थ (१६), विद्यार्थी विशेषांक निवेदन (१९), ज्ञानप्रबोधिनी प्रकाशित पुस्तक सूची, कोड्यांची उत्तरे, ओळखा पाहू,(२७, ३२), व्यि तकार्ये भाग - २ (३०), थोडीशी गंमत (३५), हास्य लहरी (३६), प्रतिसादी वाचकवीर व्हा...२ (४२)

तळटिपेतील ओळी - भारतातील अभयारण्ये

♦ **संपादक, प्रकाशक, मुद्रक** ♦
महेन्द्र सेठिया

♦ **कार्यकारी संपादक** ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ **संपादक मंडळ** ♦
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन

♦ **मुखपृष्ठ व आतील चित्रे** ♦
कुडल हिरेमठ

♦ **संपर्क पत्ता** ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.

या अंकाची किंमत : ₹ २०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

मुखपृष्ठाविषयी –निरागस बालिका व तिच्या कडेवरील बालकाचे हे वास्तववादी चित्र. हे चित्र रेखाटताना जलरंगांचा वापर प्रभावीपणे केला आहे.
- कुडल हिरेमठ

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

भेट द्या : नवेगाव राष्ट्रीय उद्यान - महाराष्ट्र, क्षेत्रफळ १३३.८८ चौ. किमी., पक्षी निरीक्षण तसेच जंगल सफारीसाठी प्रसिद्ध

संवाद

उत्कटता जोपासू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

कशी चालू आहे सुट्टी? सुट्टीत तुम्ही काही ना काही गोष्टी करत असालच, हो ना ! यातल्या किती गोष्टी तुम्ही ठरवल्यात? ज्या गोष्टी इतरांनी ठरवल्या असतील, त्यात किती हिरिरीनं, जबाबदारीनं तुम्ही सहभागी झालात? शालेय शिक्षणात सगळं इतरांनीच ठरवायचं असतं. इतरांनी ढकलायचं, *'कंपल्सरी'* करायचं, मार्कांचा धाक दाखवायचा; मगच आपण सहभागी होणार ! अशी जणू सवयच आपल्याला लागलेली असते. त्यामुळेच की काय, 'सुट्टी कशी घालवायची' याचं पूर्ण स्वातंत्र्य देऊनही, पुढाकार घेऊन, स्वत:हून अनुभव घेणं अनेकांना जमत नाही. तुमचं तसं होऊ नये, म्हणून मागच्या व या अंकात **व्य तिकार्ये, जोडीकार्ये, कार्यानुभव** इ. गोष्टी सुचवल्या आहेत. त्याआधारे या सुट्टीत **स्वयं-विकासाच्या** वाटेवरचा प्रवास तुम्ही सुरू करावा ही अपेक्षा ! तुमच्याच वयाच्या गिरिजा, रुचिर, कौस्तुभ, श्रीरंग, सानिका, शुभम, मंजिरी हे विद्यार्थी छात्र प्रबोधनच्या कार्यालयात येऊन विविध कामं करत सुट्टीची मजा अनुभवताहेत. त्या सर्वांचे मनापासून कौतुक !!

तंत्रज्ञानाच्या या युगात तुमच्यापैकी अनेक विद्यार्थी तंत्रज्ञानाचा लीलया वापर करताना दिसतात. एका बाजूला त्याचं कौतुक वाटतं, तर दुसऱ्या बाजूला त्याची थोडी चिंताही वाटते. दोन वर्षांपूर्वी तुमच्याच वयाच्या विद्यार्थ्यांची एक सहल घेऊन गेलो होतो. सहलीत, डोंगरदऱ्यातल्या भटकंतीत निसर्गाची अनेक चित्तवेधक रूपे पाहायला मिळाली. अगदी तल्लीन होऊन मनात साठवून ठेवावेत असे दुर्मीळ क्षण तेव्हा अनुभवायला मिळाले. खूपच कमी जणांनी अत्यंत उत्कटपणे ते सर्व क्षण अनुभवले. पुष्कळसे आपल्या-आपल्यातच मश्गूल ! काहीजण कानात *'इयरप्लग'* घालून गाणी ऐकत, जाता-जाता निसर्ग अनुभवत होते. काही प्रकाशचित्रे (फोटो) काढण्यात इतके दंग होते, की नुसत्या डोळ्यांनी निसर्गाची किमया त्यांनी पाहिलीच नाही. काढलेली प्रकाशचित्रे स्वत:ची/मित्र-मैत्रिणींचीच खरी अधिक; त्या प्रकाशचित्रांमध्ये निसर्ग नुसता पार्श्वभूमीला! काही जणांची अखंडपणे निरर्थक बडबड चाललेली, तर काही स्वत:चे चोचले पुरवण्यात, कोड- कौतुक करण्यात, काळजी-बाऊ-त्रास करून घेण्यातच गर्क होते. काहींना ५-१० मिनिटातंच *बोअर* झालं, तर काहींना सतत 'पुढे काय' या चिंतेनं ग्रासलेलं !

तुमच्या बाबतील नेमकं काय घडतं ? एखादा अनुभव; मग तो निसर्गातला असो की कलाकृतींचा आस्वाद घेतानाचा असो, स्वत: एखादी गोष्ट करतानाचा असो वा दुसऱ्याची कृती पाहण्यातला असो; आपण किती तल्लीन होऊन हा अनुभव घेतो? तल्लीन होणं म्हणजे आजूबाजूचं सगळं विसरणं ! अगदी स्वत:चं-काळाचं-स्थळाचं भानही नसणं. जगात जणू तेवढंच फ त घडतंय इत या एकाग्रतेनं, कुतूहलानं ते अनुभवणं. कोणतीही तुलना न करता, कोणतंही मूल्यमापन न करता, कोणत्याही प्रकारच्या व्यावहारिक फायद्याचा विचार न करता तो अनुभव घेणं; याला म्हणायचं एखादा अनुभव 'उत्कटपणे' घेणं. दुर्दैवानं तंत्रज्ञानातील अतिरेकी वापरानं अशी उत्कटता हरवत चालली की काय, अशी चिंता मला वाटते. आपल्यावर सतत बाहेरून काहीतरी आदळत असतं. त्यामुळे मनामध्ये तरलपणे काही प्रक्रियाच घडत नाही. अगदी आतपर्यंत ती पोचतच नाही. मग ती भिडणार तरी कशी अन् खोलवर ठसा उमटणार तरी कसा? गोष्ट छोटी की मोठी हे महत्त्वाचे नाही. ती गोष्ट तुम्ही किती उत्कटपणे अनुभवता यावर तिचा ठसा कसा उमटणार, त्यातून आनंद किती मिळणार, शरीरावर किती रोमांच उभे राहणार, संपूर्ण शरीरभर एक चैतन्याची लहर संचारत असल्याचा अनुभव किती मिळणार; हे ठरणार ! त्यासाठी तुम्हाला जाणीवपूर्वक प्रयत्न मात्र करावे लागणार, बरं का !

तंत्रज्ञानावर हुकमत गाजवता तर यायलाच हवी; पण त्याचबरोबर ते सहजपणे बाजूला ठेवून एखाद्या गोष्टीत तल्लीन होणं, उत्कटपणे ती गोष्ट सर्वांगांनी (शरीर-मन-बुद्धी-भावना) अनुभवणं हेही जमायला हवं. अवघड आहे; पण जमायला लागलं तर मिळणारा आनंद अवर्णनीय ! सतत ताजातवाना करणारा तो अनुभव असतो. मीही असा उत्कटपणा जपण्याचा, वाढविण्याचा प्रयत्न करतोय.

तुम्हीही या सुट्टीत, छोट्या-मोठ्या गोष्टींचा उत्कटतेने अनुभव घेणार ना? खूप भारी वाटेल, एवढं न की...खूप खूप शुभेच्छा!!

तुमचा दादा,

(महेन्द्र सेठिया)

तंत्रज्ञानाच्या प्रकाशात जग तर उजळायचे। सौंदर्याचा वेध घेत उत्कटपणही जपायचे।।

भेट द्या : चांदोली अभयारण्य – महाराष्ट्र, क्षेत्रफळ ३१७.६७ चौ. किमी., वेगवेगळ्या हरणांच्या प्रजाती व पक्षी निरीक्षणासाठी

प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

ठेच लागल्याशिवाय...

–प्रकाश पारखी

मित्रांनो, गणेशोत्सव म्हणजे धमाल, रोषणाई – दिव्यांचा लखलखाट, मिरवणूक ढोल–ताशांच्या आवाजाचा ढणढणाट, गुलालाची उधळण आणि बरंच काही! शरद आणि त्याच्या मित्रांनाही त्यांच्या वाडीतील गणेशोत्सव असाच साजरा करायचा होता. (शरदच्या काही मित्रांना मात्र काही वेगळं सुचत होतं; पण त्यांच्याकडे कुणी लक्षच दिलं नाही. शेवटी वाडीतला गणेशोत्सव शरदच्या म्हणण्यानुसार धुमधडाक्यात पार पडला...) पण अशी एक घटना घडली, की त्यामुळे शरदला आपली चूक समजली...

(रंगमंचावर अर्धवर्तुळाकार मुले बसलेली आहेत. चर्चा सुरू आहे. बडबड–गोंधळ सुरू आहे. इत यात संदीप प्रवेश करतो.)

संदीप : अरे ! आले का सगळे? ए जरा शांत बसा. (सर्वजण शांत होतात.)

शरद : ए, कशाला बोलावलंस? आज काय गडबड आहे?

संदीप : सांगतो. सांगतो. सारं काही सांगतो. दीपक, तू उभा रहा आणि सर्वांना सविस्तर सांग; आपण कशाकरता जमलो आहोत ते.

दीपक : (उभा राहतो) हे बघा मित्रांनो, गणेशोत्सव एक महिन्यावर आला आहे. यावर्षी आपल्या वाडीनं गणेशोत्सवाची जबाबदारी आपल्यावर म्हणजे वाडीतल्या मुलांवर सोपविली आहे, हे तुम्हाला माहीतच आहे. तेव्हा या वर्षीचा गणेशोत्सव कसा साजरा करायचा? कोणी–कोणी कोणकोणती कामं वाटून घ्यायची? हे ठरवण्यासाठी आपण सर्वजण जमलो आहोत. प्रत्येकानं आपापल्या गणेशोत्सवाबद्दलच्या कल्पना मांडायच्या आहेत. माधव, तुझ्यापासून सुरुवात कर.

माधव : मला वाटते, आपण गणेशोत्सव साध्या पद्धतीनं साजरा करावा. एक छोटीशी गणेशाची मूर्ती आणून त्याची पूजा करूया. रोज पूजा, आरती व प्रसादाची जबाबदारी एकेका गटाकडे सोपवूया. म्हणजे त्यासाठी जास्त वर्गणी काढायला नको. गणेशोत्सवानिमित्तानं काही व्याख्यानं, विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम करावेत व दहा दिवसांच्या ऐवजी पाच दिवसांनी गणपतीचे विसर्जन



असेच राहू द्या पाठीवरती आई-बाबांचे हात । कितीही संकटे आली तरी होईल त्यावर मात ।।

भेट द्या : पेरियार अभयारण्य – केरळ, क्षेत्रफळ ३०५ चौ. किमी., हत्ती व वाघांसाठी संरक्षित

प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टे सस, अमेरिका.

करावे. (सर्वजण 'हरकत नाही', 'बरोबर आहे'ही वा ये म्हणत असतात तेवढ्यात शरद उठतो.)

शरद : हे बघा, गणेशोत्सवाची जबाबदारी मंडळानं आपल्या मुलांकडे दिली, हे बरेच झाले. यावर्षी आपण गणेशोत्सवाची आपल्या पद्धतीनं दणदणीत तयारी करूया. गणपतीची मोठी मूर्ती आणूयात आणि तिची वाजत-गाजत प्रतिष्ठापना करूया.

संदीप : हे बघ शरद, आपण राहतो तो भाग शहराच्या मध्यवस्तीत आहे. तिथे शाळादेखील आहे. शाळा भरताना आणि सुटताना वाहतुकीची केवढी कोंडी होते. गणेशोत्सवातसुद्धा आपल्या आजूबाजूला शाळेजवळ आधीच कितीतरी मंडळं आहेत. त्यांच्या मिरवणुका आणि त्यात आपली भर नको.

शरद : हे बघ. नसता शहाणपणा शिकवू नको. अरे गणेशोत्सव म्हणजे उत्साहाचा उत्सव. अरे, मुलांना हौस असते. आपण काय रोज मिरवणूक काढणार आहोत का? काय रे, बरोबर आहे की नाही?

एकजण : हो. हो. बरोबर आहे. मुख्य रस्त्यावरून मिरवणूक झालीच पाहिजे.

शरद : हे बघा, ढोल-लेझीम पथक मी तयार करतो.

एकजण : शिवाय साउंड बॉ स, डि. जे. एकदम धमाल करूया.

दुसरा : ती व्यवस्था मी करतो.

तिसरा : अरे, त्या निमित्ताने आपण काही व्याख्यानं आयोजित करूया.

एकजण : हो का आजोबा? अरे व्याख्यानं काय शनिवारवाड्यावर कमी असतात? त्यापेक्षा ऑर्केस्ट्रा बोलवा.

दुसरा : हो. हो. मस्त फिल्मी गाणी झाली पाहिजेत. पोरं नाचली पाहिजेत.

दीपक : अरे, त्यापेक्षा आपल्यातल्या मुलांनाच संधी देऊया. कोणी गाणी म्हणेल, कोणी वादये वाजवतील, कोणी नकला करतील. अरे आपल्या मुलांमध्ये कितीतरी कलाकार दडलेले आहेत, त्यांना संधी मिळेल.

शरद : एऽऽऽ हे काय शाळेचे स्नेह संमेलन आहे का?

दीपक : अरे, पण शाळेत सर्वांना संधी मिळतेच असं नाही. इथे आपण रोज थोड्या थोड्या मुलांना संधी देऊ शकतो.

तिसरा : हो. आपण असंच करूया.

शरद : ए, ते काही झालं तरी एक दिवस ऑर्केस्ट्रा झालाच पाहिजे.

माधव : आपण असे करूया पाच दिवसांत दोन दिवस विविध गुणदर्शन, दोन दिवस व्याख्यानं आणि एक दिवस ऑर्केस्ट्रा.

माधव : दोन गट करूया. शरद तू आणि हे दोघे. तुम्ही मिरवणूक व्यवस्था बघा आणि ऑर्केस्ट्राचे नियोजन करा.

शरद : ठीक आहे. अशी सॉलीड मिरवणूक काढतो की बास... किमान दोन पोती गुलाल आणायचा.

दीपक : हे बघ. गुलाल आणशील तो वाडीच्या बाहेर उधळायचा.

शरद : सगळी वाडी गुलालमय झाली पाहिजे.

दीपक : दुसऱ्या दिवशी वाडी साफ पण तुलाच करावी लागेल. आम्ही सगळी मुलं वाडीचं पटांगण साफ करणार आणि तू गुलाल टाकून ते परत घाण करणार?

शरद : काय नाय घाण होत. पालिकेचे सेवक कशाला आहेत मग?

माधव : अरे, सेवक रोज रुमाल बांधून वाडी झाडतात. तरीसुद्धा ते सदाशिवकाका सारखे आजारी पडतात. गुलालामुळे ते आजारी पडले तर त्याची जबाबदारी तू घेणार आहेस का?

शरद : ठीक आहे. आम्ही फ त रस्त्यावर गुलाल उधळू.

लहान मुलांचे मन म्हणजे, स्वच्छ कोरी पाटी। आईच्या हातात खडू, त्यावर लिहिण्यासाठी ।।

भेट द्या : परांबीकुलम अभयारण्य-केरळ, क्षेत्रफळ २८५ चौ. किमी., दुर्मीळ फुलपाखरे, शेपटीच्या घारीसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लासगो, स्कॉटलंड (U.K.)

माधव : अरे, आपल्या शहरासमोर प्रदूषणाचे केवढे मोठे संकट उभे आहे. झाडं तोडल्यामुळे हवा शुद्ध होत नाही. उलट वाहनं वाढली, वाहतुकीची कोंडी झाली की अजून प्रदूषण वाढते. वाहनांचे आवाज, घरोघरचे टी. व्ही, संगीताचे आवाज आणि त्यात आपण सार्वजनिक ठिकाणी स्पिकर्सची भिंत उभी करून आवाजाचे प्रदूषण वाढवतो. शहरात मधून वाहणाऱ्या नदीत गटारे सोडतो, कचरा-निर्माल्य टाकतो. विहिरी स्वच्छ ठेवत नाही. पाण्याचे प्रदूषण वाढवतो. अरे, निदान आपल्या हाती असलेल्या आचार-विचारांचे प्रदूषण तरी आपण थांबवूया.
(मुले टाळ्या वाजवतात.)

शरद : हे बघा! ते काही असले तरी मिरवणूक होणार, आणि तीसुद्धा डी. जे. लावून, गुलाल उधळून...

काही जण : हो ऽऽऽ हो ऽऽऽ

दीपक : ठीक आहे. तुम्ही मिरवणूक काढा; पण मुख्य मंडपात आल्यावर डी. जे बंद करायचा आणि गुलाल पण बंद झालाच पाहिजे.

शरद : ठीक आहे. ठीक आहे. चला रे लागा तयारीला. (शरद आणि काही मुले जातात. दीपक, माधव आणि काही मुले तिथेच थांबतात)

दीपक : या शऱ्याला ना एकदा ठोकला पाहिजे.

माधव : अरे, मारामारी करून प्रश्न सुटत नसतात. ठेच लागल्याशिवाय शहाणपण येत नाही. काढू दे त्याला मिरवणूक. आपला विरोध मिरवणुकीला नाही; पण गुलाल आणि डी. जे. ला माझा विरोध आहे.

दीपक : अरे, आपण वाडी स्वच्छ करणार आणि हा त्यावर गुलाल टाकणार. आपण चांगले कार्यक्रम करणार आणि हा ऑर्केस्ट्रा आणून धांगडधिंगा करणार. अरे, हा स्वत: तर सुधारणार नाहीच पण आणखी चार जणांना बिघडवणार.

माधव : अरे, त्यालाच तर आचार-विचारांचे प्रदूषण

आई म्हणायची संध्याकाळी जातात झोपी झाडं । मग सायंकाळी फूलं तोडायला हात कसा होईल पुढं ?।।

भेट द्या : थट्टेकड पक्षी अभयारण्य - केरळ, क्षेत्रफळ २५ चौ. किमी., दुर्मीळ पक्ष्यांच्या निवासासाठी प्रसिद्ध

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

म्हणतात. हे प्रदूषण रोखलेच पाहिजे.

दीपक : प्रदूषण कसे रोखणार? ते काही नाही शऱ्याला चांगला चोपला पाहिजे. त्याशिवाय तो सुधारणार नाही.

माधव : दीपक, मारामारीनं हा प्रश्न सुटणार नाही. अरे, त्याला शिक्षकांनी काय कमी शिक्षा केलीय का? मी ऐकलंय, की त्याचे वडीलही त्याला मारतात.

दीपक : अरे, काय सांगतोस?

तिसरा : हो ! अरे मी त्याच्या जवळच राहतो नं. एरवी गल्लीतही तो अशीच दादागिरी करतो. मोठ्यांच्या दहीहंडीतही हा सामील असतो. घरोघरी जाऊन दमदाटी करून वर्गणी गोळा करतो. दहीहंडीला डी. जे. लावून त्यावर रस्त्यात नाच करतो.

माधव : त्याला कोणीतरी समजावलं पाहिजे. त्याच्या जवळच्याच मित्रांनी त्याच्याशी बोलायला हवं. असो. चला, आपणही कार्यक्रमाच्या तयारीला लागूया. चित्रकला चांगली असणाऱ्या मुलांना सजावट विभाग देऊया.

माधव : दोन दिवसांत मोठ्यांशी बोलून व्याख्यानाचे व ते ठरवले पाहिजेत.

चौथा : माझ्या ओळखीचे एक शास्त्रज्ञ आहेत. ते 'विज्ञानातील गंमतीजमती' या विषयावर मुलांसाठी छान व्याख्यान देतात. चला तर मग...

(रंगमंचावर अंधार करून मिरवणुकीची वाद्ये, आवाज, आरती, मुलांची गडबड इ. ऐकवावे व गणेशोत्सव संपल्या नंतरचा दिवस परत मुले जमली आहेत...)

माधव : मित्रांनो, आपला गणेशोत्सव तर व्यवस्थित पार पडला. पण आज आपण जमलो आहोत ते वेगळ्या कारणाकरिता.

दीपक : तो शऱ्या नाही का आला?

माधव : (हाताने शांत करत) अरे, आपल्या वाडीतील आपला एक मित्र मोहन याला हॉस्पिटल मध्ये ठेवले आहे.

एक : काय? काय झालं त्याला?

दुसरा : अरे, मिरवणुकीत नाही का तो बेशुद्ध पडला?

दीपक : हा त्या शऱ्याचाच आगाऊपणा.

माधव : हे बघा त्याबद्दल आता चर्चा नको. महत्त्वाचे हे आहे की मोहनची परिस्थिती गंभीर आहे. हॉस्पिटलमध्ये उपचार करण्याइतके पैसे त्याच्या घरच्यांकडे नाहीत. मित्र म्हणून आपण सर्वांनी त्याला मदत केली पाहिजे.

एक : पण त्याला झालंय तरी काय? आणि कशामुळे?

माधव : अरे, त्याला धुळीची *ॲलर्जी* हाती. तो नको म्हणत असताना मित्रांच्या आग्रहामुळे त्याच्या अंगावर गुलाल टाकला. डी. जे. च्या भिंतींपुढे तो नाचला. त्यामुळे रस्त्यातच तो बेशुद्ध पडला. आम्ही त्याला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेले आणि त्याच्या घरच्यांना बोलवून घेतले.

दोन : अरे, मलासुद्धा त्रास झाला त्या गुलालाचा.

तीन : मला तर काल काहीच ऐकू येत नव्हतं. कानात दडे बसल्यासारखे झाले.

एक : अरे कितीतरी मुलांना खोकल्याचा त्रास सुरू झालाय.

दोन : आणि मिरवणुकीमुळे केवढी वाहतुकीची कोंडी झाली होती.

दीपक : अरे, त्यात एक ॲम्ब्युलन्स अडकली होती. दहा-बारा मुलांनी गाड्यांच्या गर्दीतून त्या ॲम्ब्युलन्सला वाट करून दिली. त्यामधील रुग्णाची अवस्था गंभीर झाली होती.

माधव : अरे, म्हणूनच आम्ही तुम्हाला सांगत होतो. डी.जे. च्या तालावर मिरवणूक नको, गुलाल नको.

एक : आम्हाला पटलं, आम्ही उगाच त्या शऱ्याच्या नादी लागलो आणि तुम्हाला विरोध केला.

दुसरा : येऊ दे आता शऱ्याला.

आई म्हणायची अन्नावर, कधी काढू नये राग। कोणाला लागली लाथ, तर लावायची पाया पडायला भाग।।

भेट द्या : पेपारा अभयारण्य-केरळ, क्षेत्रफळ ५३ चौ. किमी., ४३ सस्तन प्राण्यांच्या, २३३ प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजातींसाठी

प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.

माधव : हे बघा, शरदला आपण समजावून सांगितलं पाहिजे.

दीपक : समजावून सांगण्यातला नाही तो. सर्वांनी मिळून त्याला चोपला पाहिजे.

एक : हो. हो. चोपला पाहिजे.

माधव : हे बघा सगळ्यांनी मिळून प्रथम मोहनला मदत केली पाहिजे. त्याच्यासाठी जेवढी श य असेल तेवढी आर्थिक मदत गोळा करू. त्याच्या घरच्यांना काय मदत पाहिजे ते विचारू. अरे दवाखान्यात बसायलाही हवे असते. बोला कोण-कोण काय-काय मदत करेल?

शरद : (धावत येतो) मी आधी मदत करणार. माझ्यामुळेच मोहन आजारी पडला आहे. मित्रहो, मी हात जोडतो. माझं चुकलं. मिरवणूक आणि गुलालाचा आग्रह माझाच होता. कसं सांगू तुम्हाला, वाहतुकीच्या कोंडीत जी ॲम्ब्युलन्स अडकली होती तिच्यामध्ये माझा मामा होता. मी इकडे डी. जे. समोर नाचत होतो. गुलाल उधळत होतो आणि माझा मामा त्या ॲम्ब्युलन्स मध्ये दवाखान्याच्या वाटेकडे डोळे लावून बसला होता. दीपक, मी चुकलो, मला माफ कर. तू आणि काही मुलांनी मिरवणूक सोडून त्या ॲम्ब्युलन्सला मार्ग मोकळा करून दिला; म्हणून माझा मामा आज जिवंत आहे. घरी गेल्यावर मला कळाले, की मामा दवाखान्यात आहे आणि माझ्या मिरवणुकीमुळे कदाचित...
(हुंदका देतो) दीपक, माधव आणि मित्रांनो मला माफ करा. तुझ्या बोलण्याची मी टिंगल करत होतो. पण त्याचा फटका जेव्हा मला बसला तेव्हा माझे डोळे उघडले. मित्रांनो, मला माफ करा. तुम्ही म्हणाल ती शिक्षा घ्यायला मी तयार आहे. (रडतो)

माधव : त्याला जवळ घेत. शांत हो शरद. अरे, तुला समजावण्याचा आम्ही खूप प्रयत्न केला; पण म्हणतात ना ठेच लागल्याशिवाय शहाणपण येत नाही. पण यापुढे नुसती
माफी मागून चालणार नाही. हे बघ शरद, तुझं ऐकून आपण गुलाल उधळला, धांगडधिंगा करून मिरवणूक काढली, आवाजाचा ढणढणाट केला यालाच म्हणतात विचारांचं प्रदूषण! कुणाच्या तरी प्रभावाने एखादी चुकीची गोष्ट सहज पसरते बघ समाजात. हवा, पाणी, ध्वनी यांच्या प्रदूषणाबरोबरच आचार-विचारांचे जे प्रदूषण झालंय ते दूर करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. चला सर्वजण
प्रतिज्ञा घेऊया 'आजपासून हवेचे, पाण्याचे, ध्वनीचे व आचार-विचारांचे प्रदूषण होऊ देणार नाही! आमचे स्वत:चे व समाजाचे आरोग्य सुदृढ ठेवू. जय वसुंधरा !'
(सर्वजण त्यांच्याबरोबर प्रतिज्ञा घेतात.)

- प्रकाश पारखी
इ. ७, गंगातीर्थ, अरण्येश्वर मंदिराजवळ, पर्वती, पुणे ९

जेव्हा जेव्हा होतात भांडणे आम्हा भावंडात। आई म्हणते 'अरे एक तीळ वाटून खायचा सात जणांत'।

भेट द्या : सायलेंट व्हॅली नॅशनल पार्क-केरळ, क्षेत्रफळ २३६.७४ चौ. किमी., लांब शेपटीचा पोपट व विविध किड्यांच्या प्रजातींसाठी
प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.

खुर्ची



खुर्ची असते सुखाची सोबत
खुर्ची असते दु:खाची सोबत
खुर्ची असते एक आठवण
खुर्ची असते व्य तीची सोबत ।।१।।

राजकारणात मताची खुर्ची
जेवणाची, अभ्यासाची
झोपेची अन् गमतीची
एक निमित्त असते खुर्ची ।।२।।

खुर्चीत बसतात लाडोबा
खुर्चीत बसतात आजोबा
खुर्चीत बसतात अस्मादिक
विचारांच्या तंद्रीत ।।३।।

विसाव्याचे साधन खुर्ची
चिंतनाचे साधन खुर्ची
विरंगुळ्याचे साधन खुर्ची
विश्वासाचे निधान खुर्ची ।।५।।

– मृदुला पाठक
४७०, शनिवार पेठ, पुणे 411030

बौद्धीक खुराक



चेकआऊट स्लिप

पुढे गरवारे सुपर मार्केटची एक चेकआऊट स्लिप असून त्यावर एक बेरीज दाखवली आहे. ती बेरीज येण्यासाठी १ ते ९ अंक वापरा. प्रत्येक अंक एकदाच आला पाहिजे. यापैकी एका वस्तूची किंमत इतर दोहोंपैकी एका वस्तूच्या तिप्पट आहे.

कोणते अधिक लांबीचे?

T

इंग्रजी अक्षर (टी) T ची शेजारील आकृती नीट न्याहाळा.
T चा आडवा भाग की उभा भाग जास्त लांबीचा आहे ते सांगा पाहू...

आठवतो अजूनी मजला, तो वाडा वडिलोपार्जित । मिणमिणत्या संध्याकाळी, बसलेले आजोबा खुर्चीत ।।

भेट द्या : नागार्जुन सागर श्रीशैल्यम – आंध्रप्रदेश, क्षेत्रफळ ३५६८ चौ. किमी., वाघांसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - श्री. संदीप जगधने, पुणे.

प्रतिमा उदंड झाल्या...

– किरण पुरंदरे

डिजिटल कॅमेऱ्याचे आगमन झाले आणि जो तो हवे तसे, हवे तितके फोटो मनमुराद काढू लागला. निसर्गाची नाना रूपं चित्रबद्ध होऊ लागली. फोटोग्राफीचा हा छंद खूप आनंद देणारा, खूप माहिती संग्रहित करणारा असला तरी थोड्या डोळसपणे तो जोपासला तर...
'निसर्गाचा अभ्यास करणं, पर्यावरणीय प्रश्नांना वाचा फोडणं, निसर्ग संवर्धनाला हातभार लावणं इ. साठी या छंदाचा उपयोग करता येईल' हा डोळस दृष्टिकोन या लेखातून नक्कीच मिळेल.

भारतात १९९६–९७ च्या दरम्यान अंकीय प्रकाशचित्रणाला (डिजिटल फोटोग्राफी) सुरुवात झाली. हळूहळू कॅमेरा रोल्सूची भेंडोळी नष्ट होऊन त्यांची धुणी बडवणाऱ्या प्रयोगशाळा बंद पडल्या. रोल विकणाऱ्या कंपन्या बंद पडल्या. संगणकीय प्रणालीवर आधारित असल्यामुळे सामान्य माणसाला चांगल्या प्रकारचं प्रकाशचित्रण करणं श य झालं; प्रकाशचित्रण सुलभ, सोपं आणि स्वस्त झालं कारण वारंवार करावा लागणारा फिल्मचा खर्च करण्याची गरज उरली नाही. प्रकाशचित्रणात विशेष रुची असणाऱ्या छांदीष्टांनी मोठ्या प्रमाणात कॅमेरे विकत घेऊन जग 'फोटोक्रांत'(!) करायला सुरुवात केली. निसर्गाची नाना रूपं – धबधबे, डोंगर, दऱ्या, समुद्रकिनारे, वाळवंट, हिमशिखरं, ऋतुचक्र, फुलं, झाडं–झुडपं, कीटक, फुलपाखरं, पतंग, बेडूक, इतर उभयचर, सरपटणारे प्राणी, पक्षी, सस्तन प्राणी, समुद्रातील जैवविविधता चित्रबद्ध झाली. प्रकाशचित्रकारांच्या मनसो त उनाड यांमुळे सामान्यातील सामान्य लोकांनी घरबसल्या विविधरंगी वसुंधरेच्या मोहक रूपांचा आस्वाद घ्यायला सुरुवात केली. कॅमेरा आणि लेन्सचं एकत्रित वजन न झेपणाऱ्या चिंट्यापिट्यांच्या गळ्यांमध्ये महागडे कॅमेरे लटकताना दिसू लागले. सहजपणे न दिसणाऱ्या पशुपक्ष्यांच्या प्रकाशचित्रांनी वर्तमानपत्रं, नियतकालिकं, पाक्षिकं, मासिकं आणि वार्षिकांमध्ये रंग भरले.

माडीवरच्या गच्चीत रात्री झोपायचो सारे। नेहमीपेक्षा येथे जास्तच दिसायचे तारे।।

भेट द्या : श्री व्यंकटेश्वरा नॅशनल पार्क–आंध्रप्रदेश, क्षेत्रफळ ३५३ चौ. किमी., पिवळ्या गळ्याचा बुलबुल, सोनेरी पालींसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई.

प्रकाशचित्रकारांच्या या वैश्विक तांड्यामुळे काही दुर्मीळ जीव प्रकाशात आले. त्यांच्या संवर्धनाचं मूल्य जगाला समजलं. पशुपक्ष्यांच्या नवीन जाती प्रकाशात आल्या. काही निसर्गसुंदर जागांना रातोरात प्रसिद्धी मिळाली. सातारा जिल्ह्यातलं कास पुष्पपठार अशा हौशी प्रकाशचित्रकारांमुळे लोकप्रिय झालं. त्यामुळे तिथे भेट देणारे तथाकथित पुष्पप्रेमी हीच एक मोठी डोकेदुखी झाली असली तरीसुद्धा कास प्रकाशात आलं नसतं; तर तिथे बंगले झाले असते! मेजवान्या झोडाव्यात तसे लोक निसर्गात जाऊन प्रकाशचित्रांची लयलूट करू लागल्यामुळे प्रतिमा उदंड झाल्या. रंगीबेरंगी प्रकाशचित्रांना प्राधान्य देणारी निसर्गावरची पुस्तकं भराभर प्रकाशित झाली. फोटो बघायला मस्त वाटतं, म्हणून लोकांनी अशी पुस्तकं विकतही घेतली. सामान्य लोकांच्या मनात निसर्गाबद्दल आवड आणि प्रेम निर्माण करण्यात फोटोग्राफीचा मोठा आणि महत्त्वाचा वाटा आहे. फोटोग्राफीचा परिणामकारक उपयोग करून एखाद्या पर्यावरणीय प्रश्नाला वाचा फोडता येते. निसर्ग संवर्धनासाठी धडपडणाऱ्या लोकांना असे प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वाचा पुरावा मिळतो. लोकांचे दबावगट तयार करता येतात.

फोटोग्राफीची दुसरी बाजू अस्वस्थ करणारी आहे. एक उदाहरण देतो. केव्हा एकदा मला 'तिबेटी खंड्याचा' (ओरिएंटल डार्फ किंगफिशर) फोटो मिळतोय आणि तो मी सोशल नेटवर्किंग साईट्सवर टाकून जास्तीत जास्त 'लाई स' मिळवतोय, अशा स्पर्धेत उतरलेले फोटोग्राफर्स त्या पक्ष्याच्या ५ फूट इत या जवळ गेले. केवळ फोटोग्राफर्सनी त्रास दिल्यामुळे खंड्याच्या त्या जोडीनं घरटं करण्यासाठी निवडलेली ती जागा कायमची सोडून दिली. त्यानंतर खंड्याचा तो जोडा कुठे गेला हे कुणालाच कळलं नाही. पाथरशेतचा तो 'ओडीके' कुणीतरी सोशल नेटवर्किंग साईटवर टाकला होता, म्हणून त्याच्याबद्दल सगळ्यांना कळलं होतं. अशा वेळेला प्रत्येक पक्ष्याचं 'सामाजिक अंतर' (सोशल डिस्टन्स) ठरलेलं असतं याचं भान राहात नाही. कारण फोटो काढणारी प्रत्येक व्य ती देहभान हरपलेली असते. 'फोटो काढू नका, अभयारण्यात जाऊ नका', असं माझं म्हणणं नाही. अभयारण्यात जरूर जा, फोटोही काढा ; पण नियमांचं काटेकोर पालनही करा. कुठल्याही परिस्थितीत निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घ्या. फोटोग्राफर ज्या ज्या ठिकाणी जातात त्या त्या ठिकाणी स्थानिक लोकसमूहांची मदत घेऊन त्याबद्दल त्यांना योग्य मोबदला देणं आवश्यक आहे. असं केलं तरच स्थानिक लोक निसर्गाची काळजी घेतील; पण या व्यवहारात प्रामाणिकपणा असला पाहिजे. दोन्ही बाजूंनी निसर्गाचं हित जपलं पाहिजे.

निसर्ग संवर्धनाचं महत्त्व लोकांना पटवून देण्यासाठी आणि चारचौघांमध्ये, पेपरमध्ये नाव झालं की छान वाटतं म्हणून फोटोंचं प्रदर्शन भरवणं यात काहीही गैर नाही; पण अशा प्रदर्शनांची भौगोलिक व्याप्ती वाढवली पाहिजे. ही प्रदर्शनं दूरस्थ खेड्यापाड्यांमध्ये, अभयारण्यांच्या आणि राष्ट्रीय उद्यानांच्या भोवतालच्या वाड्यावस्त्यांमध्ये आयोजित करण्याची खरी गरज आहे. कारण तिथे काही प्रमाणात का होईना पण निसर्ग टिकून आहे. पिटेझरी अभयारण्याच्या सीमेवरील या नागझिरा गावात असलेल्या शाळेतल्या मुलांनी नागझिरा अभयारण्य पाहिलेलं नव्हतं. त्यांची पहिली सहल आम्ही 'निसर्गवेध' संस्थेतर्फे काढली, तेव्हा त्यांच्यासोबत आलेल्या शिक्षकांनी सांगितलं, की नागझिरा म्हणजे काय हे त्यांना ठाऊक नव्हतं. स्थानिक लोकांना किंवा आदिवासींना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी घट्ट जोडल्या गेल्या आहेत अशाच गोष्टींची माहिती असते. उदा. औषधी वनस्पती, काही मोजके पक्षी, सस्तन प्राणी इत्यादी. त्यांना सर्व कीटकांची, फुलपाखरांची, फुलांची, पक्ष्यांची आणि प्राण्यांची माहिती असतेच असं नाही. त्यामुळे निसर्गाचा नाश करण्यात प्रमुख वाटा उचलणाऱ्या शहरी लोकांबरोबरच पिढ्यान्‌पिढ्या ज्यांची नाळ निसर्गाशी जोडलेली असते अशा स्थानिक लोकांच्याही प्रबोधनासाठी निसर्गविषयक फोटोंची प्रदर्शनं भरवली पाहिजेत.

निसर्गाच्या ऱ्हासाचा सध्याचा वेग बघता नुसती

भोपळा बांधून पोहणे, पाट रुंद पाण्याचा। झाडाच्या सावलीत आस्वाद, भाकरी अन् ठेच्याचा।।

भेट द्या : महावीर हरीना वनस्थळी राष्ट्रीय उद्यान–आंध्रप्रदेश, क्षेत्रफळ १४.५९ चौ. किमी., हरणांच्या प्रजातींसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

प्रदर्शने भरवून उपयोग नाही. अशा प्रदर्शनांमध्ये मांडलेल्या फोटोंची विक्री करून किंवा प्रवेशमूल्य आकारून त्यामधून जमा झालेल्या निधीतून, जंगलांच्या जवळ असणाऱ्या गावांमध्ये पर्यायी इंधन पुरवण्यापासून नैसर्गिक पाणवठ्यांचं पुनरुज्जीवन करण्यापर्यंत निसर्ग संवर्धनाची अनेक कामं हाती घेता येतील. अशा वेळी फोटोंची विक्री करण्यामागील हेतू स्पष्टपणे जाहीर केल्यास ज्यांना निसर्गरक्षणाची कळकळ आहे, भरपूर पैसा आहे; पण प्रत्यक्ष काम करायला वेळ नाही अशा धनाढ्य लोकांचा प्रतिसाद मिळू शकेल.

आजच्या घडीला शेकडो फोटोग्राफर्स हजारो फोटो काढत आहेत. अशा फोटोंचं कायमस्वरूपी संग्रहालय (फोटो म्युझियम) उभारता येईल. कारण आजही अनेक कारणांमुळे संगणकापासून दूर राहिलेले हजारो लोक आहेत. प्रत्येक फोटोबरोबर जर तो कुठे, केव्हा काढला, त्यावेळी कॅमेऱ्याची नेमकी रीडिंग्ज् काय होती, फोटोतील घटकाचं शास्त्रीय नाव, इंग्रजी नाव, स्थानिक भाषेतील नाव, निसर्गातील भूमिका, सद्यस्थिती आणि फोटोग्राफरचं नाव अशी माहिती दिली तर त्याचं मूल्य कितीतरी पटींनी वाढेल. पुणे जिल्ह्याच्या निसर्गइतिहासाची माहिती देणारं स्वतंत्र दालन निर्माण करता येईल. निसर्गाच्या अभ्यासकांना असं संग्रहालय म्हणजे पर्वणी ठरेल.

सर्वसाधारणपणे प्रदर्शनांमध्ये किंवा संगणकाच्या संकेतस्थळांवर सादर केल्या जाणाऱ्या फोटोंमध्ये काळाच्या ओघात लोकप्रिय झालेल्या पशुपक्ष्यांच्या 'तारांकित' जातींचा (वाघ, फ्लेमिंगो, क्रौंच पक्षी, शिकारी पक्षी) प्राधान्यानं समावेश केलेला आढळतो. कीटक, पतंग, देवगांडुळांसारखे उभयचर, वाघळं अशा निसर्गाच्या घटकांचा फोटोग्राफर्सनी विचार केला पाहिजे. एखादंच ठिकाण निवडून तिथे संपूर्ण वर्षभर ऋतुचक्रानुसार होणाऱ्या बदलाचं अवलोकन, भारतातील निसर्ग संवर्धनाच्या पारंपरिक पद्धतींचा अभ्यास करायला हवा. एखाद्या किंवा अनेक व्य तींनी एकत्र येऊन काम केल्यामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणाच्या यशकथा, निसर्गावर वेळोवेळी होणारे आघात आणि त्यामुळे होणारी नैसर्गिक अधिवासांची अवनती यांच्याही चित्रणास प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. निसर्गाचं केवळ सुंदर चित्र रंगवण्याचे आणि तेच पुन्हा पुन्हा उगाळण्याचे दिवस केव्हाच संपले आहेत. पुणेकर मुळा आणि मुठा या नद्यांमध्ये किती प्रमाणात प्लॅस्टिक फेकतात याचा 'सुंदर फोटो' पुणे–सोलापूर रस्त्यावरील कवडी येथे मिळू शकेल!

उत्कृष्ट फोटोग्राफर हा उत्कृष्ट निसर्ग अभ्यासक असेलच आणि उत्कृष्ट निसर्ग अभ्यासक हा उत्कृष्ट फोटोग्राफर असेलच असं नाही. या दोन्ही गुणांनी संपन्न असलेल्या व्य ती सुवर्णगरुडासारख्या दुर्मीळ असतात. फोटो काढण्याच्या नुसत्या कल्पनेनंच फोटोग्राफर इतका भारावलेला असतो, की तो प्रत्यक्षात कशाचा फोटो काढतोय हे त्याला बऱ्याचदा माहीत नसतं. माझी एक विनंती आहे. भारतातल्या तमाम फोटोग्राफर मंडळींनी अधूनमधून त्यांचे कॅमेरे घरी ठेवून दुर्बिणी हातात घ्याव्यात. निसर्गाचा अभ्यास करावा. आपली निरीक्षणं लिहून काढावीत. जर एखाद्या फोटोग्राफरनं फुलपाखराचा फोटो काढला असेल तर तो त्याचा फोटो एखाद्या संकेतस्थळावर टाकून त्याचं नाव वगैरे शोधून काढतो. पण 'त्या फुलपाखराबद्दल दोन ओळी लिही', असं म्हटलं की त्याची दांडी उडते! मराठी भाषेतील निसर्गविषयक ललित साहित्यात शास्त्रीय निरीक्षणांनी समृद्ध असं लिखाण त्या मानानं कमी वाचायला मिळतंय याचं एक कारण 'अंकीय प्रकाशचित्रणामुळे झपाटलेली तरुण पिढी' हे असू शकेल.

'निसर्गात ज्या घटकांची फोटोग्राफी किंवा अभ्यास करून आपण मोठे होतो; त्यांचं संरक्षण करणं ही आपली नैतिक जबाबदारी आहे', असं ज्या दिवशी प्रत्येक व्य तीला हृदयापासून वाटेल आणि ती कामाला लागेल; त्या दिवशी सह्याद्रीच्या जंगलात पावसाळी ओढ्याच्या कडेला रंगीबेरंगी चित्रासारखा सुंदर दिसणारा तिबेटी खंड्या पुन्हा हजेरी लावेल !

❖ ❖ ❖

– किरण पुरंदरे
२/अ, प्रशांत, एरंडवन, पुणे ४११००४

आई म्हणते 'देव आहे म्हणून जगात आहे शांती'। इतकी कामे करताना तो कधी घेतो विश्रांती ?।।

भेट द्या : पखुई टायगर रिझर्व्ह–अरुणाचल प्रदेश, क्षेत्रफळ ८६१.९५ चौ. किमी. वाघांसाठी संरक्षित क्षेत्र, घनदाट जंगल

प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.



।। वाचाल तर वाचाल ।। वाचाल तर वाचाल ।।

दोस्तांनो, जीवनाच्या वाटचालीत यशस्वी होण्यासाठी 'मने, मनगटे हेच आपलं खरं भांडवल', असं आपल्याला सांगता येईल. अनिवार ध्येयास तीने भारावून जाऊन माणसे काळाला कलाटणी देतात आणि यशाचे मानकरी ठरतात. याचा प्रत्यय 'महाराष्ट्रातील उद्योजक ' हे पुस्तक वाचताना यईल.

जयप्रकाश झेंडे यांचं 'महाराष्ट्रातील उद्योजक' हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्रातील उद्योजकांना मानाचा मुजरा ठरावा. या पुस्तकात भारतीय उद्योगाचे जनक– जमशेटजी टाटा, धीरूभाई अंबानी, बाबूराव (बी. जी.) शिर्के, राजाभाऊ चितळे, आबासाहेब गरवारे, शेठ जमनालाल बजाज, अझिम प्रेमजी, आनंद महिंद्रा, आदी गोदरेज, महाराष्ट्राला 'उद्योगी' करणारे उद्योगी कुटुंब – शंतनुराव किर्लोस्कर, केरळातून येऊन महाराष्ट्रात रमलेले उद्योगपती – चंद्रन मेनन, नारायण मूर्ती, बिर्ला कुटुंब, अनिल मेहता यांच्या चरित्रांचा वेध घेतलाय.

दोस्तांनो, संपत्ती कमवण्याचे दोन उद्देश असू शकतात– स्वत:साठ ी आणि राष्ट्रासाठी. ही गोष्ट लक्षात घेऊन जमशेटजींनी



महाराष्ट्रातील उद्योजक

– प्रसाद वैद्य

राष्ट्रासाठी संपत्ती निर्माण करणाऱ्या एका कार्यक्षम परंपरेलाच जन्म दिला. त्याची प्रचीती आपण आज घेत आहोत.

भारतीय उद्योगातील हिमालय असं ज्यांना म्हणावं असं उत्तुंग व्य ितमत्त्व म्हणजे जे. आर. डी. अर्थात जहांगीर रतनजी दादाभाई टाटा. आपल्या अभिजात कार्यकुशलतेच्या, बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी उत्तुंग अशी झेप घेऊन प्रथम आकाश आणि नंतर पृथ्वी गाजवली.

असं म्हणतात, की पोटात शिरण्याचा मार्ग जिभेवरूनच जातो आणि पोटात शिरलं की मनात घर करणं सहज श य होतं. चितळे बंधू मिठाईवाले आणि तमाम खवय्ये यांच्यातलं नातंही अगदी तसंच आहे. केवळ गुणवत्ता आणि परिश्रम यांच्या जोरावर राजाभाऊंनी आपल्या अद्वितीय दर्जाच्या उत्पादनांची 'ब्रँड इमेज' तयार केली आहे.

मित्रांनो, अशा अनेक उद्योजकांचा प्रेरणादायी जीवन प्रवास या पुस्तकात लेखकाने बारकाईने रेखाटलेला आहे. त्यांच्या कार्याबद्दल वाचत असताना पुढे काय घडणार आहे याची उत्कंठा कायम राहते.

संधीचा शोध, बांधिलकी, अविचल श्रद्धा, योग्य दिशा, योग्य माणसांची निवड, धोका पत्करण्याची तयारी, प्रयत्नातील सातत्य, कल्पकता आणि चिकाटी हे काही गुण त्यांच्या कहाण्या वाचताना प्रकर्षाने तुम्हालाही जाणवतील व तुमच्यातील उद्योजक वृत्तीला प्रोत्साहन व प्रेरणा देतील.

चिकाटी, जिद्द, कल्पकता, कष्ट करण्याची तयारी यांसारखे गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न तुम्ही विद्यार्थीदशेपासूनच केलात तर कोणतीही गोष्ट अश य नाही. होय ना?

पुस्तकाचे नाव : महाराष्ट्रातील उद्योजक
लेखक : जयप्रकाश झेंडे
प्रकाशक : डायमंड
पृष्ठसंख्या : १९०, किंमत : ₹ २२५/-

❖ ❖ ❖

– प्रसाद वैद्य
श्रीकृष्ण मंदिर रोड, चोपडा,
जि. जळगाव

तुकडे जमवत जमवत आयुष्यभर खेळायचे। जिंकलो नाही तरी चालेल, शीतल चांदणे मात्र मिळवायचे।।

भेट द्या : सेसा ऑर्किड उद्यान – अरुणाचल प्रदेश, क्षेत्रफळ १०० चौ. किमी., आर्किड्सच्या प्रजाती व त्यावरील संशोधनासाठी

प्रायोजक - प्रतिभा इले ट्रिकल्स, पुणे.



।। वाचाल तर वाचाल ।। वाचाल तर वाचाल ।।

वाचलेच पाहिजे असे काही...

कथा, कविता, ललित लेख इ. वाङ्मय प्रकारात लेखन करणाऱ्या प्रा. सुहासिनी देशपांडे यांच्या अनेक कथा तुम्ही 'छात्र प्रबोधन' मधून वाचल्या असतील. कुमारवयीन मुलांचं भावविश्व अतिशय तरलपणे कथांमधून मांडणाऱ्या सुहासिनी–ताईंचा 'इंद्रधनु आणि इतर कथा' हा चौथा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला. त्यातील 'इंद्रधनु' या कथेवरूनच संग्रहास नाव दिले आहे.

या कथासंग्रहात बारा कथा एकत्र केलेल्या आहेत. या साऱ्याच सुखान्तिका आहेत. किशोरवयीन मुलांच्या मनाला त्या दिलासा देतील, आशावाद देतील व सदाचाराचे बीज त्यांच्या मनामध्ये नकळत पेरून जातील. विशेष म्हणजे या कथांपैकी एकही कथा कपोलकल्पित नाही. प्रत्यक्ष वर्तमानात पाहिलेल्या व्यक्तींचे नामांतर करून त्यांचा जीवनसंघर्ष एखाद्या इंद्रधनु प्रमाणे सुहासिनीताईंनी डोळ्यांपुढे उभा केला आहे.

लेखिका तीन दशकांहून अधिक काळ शैक्षणिक क्षेत्रातच कार्य करून निवृत्त झाली असल्याने बहुधा त्यांच्या ह्या कथाद्वादशीपैकी दोन तृतीयांशापेक्षाही अधिक गोष्टी या मुख्यत शाळकरी वयाच्या मुलांच्या जीवनावरील दिसतात.

'इंद्रधनु' ही कथा घर सोडून



– यशवंतराव लेले

पळालेल्या दोन मुलांची आहे. गरिबीने गांजलेली त्यांची विधवा आई अखेरीस स्वप्नांचं इंद्रधनुष्य कसं पाहू लागते त्याची भावपूर्ण व उत्कंठा वाढवणारी ही कथा आहे.

कष्ट करून शिकण्यासाठी धडपडणाऱ्या व महाविद्यालयात नुकताच प्रविष्ट झालेल्या मुलाची एक कथा अतिशय भावपूर्ण आहे.

'धाडसी मेघना' ह्या कथेतील मेघनाचे वय बारा–तेरा वर्ष आहे. त्सुनामी ही भयानक आपत्ती सागरासन्निध राहणाऱ्यांना भोगावी लागते हे मेघना अनुभवते; पण हताश, निराश, पराभूत न होता त्या आपत्तीवर ती मात करते हे विशेष ! ही सकारात्मकता हा लेखिकेचा विशेष आहे. कुबड आलेला मुलगा हा कुणाला त्याच्या व्यंगामुळे विनोद करण्यायोग्य वाटू शकला तरी लेखिकेला सहानुभूतीपूर्वक त्याचे व्यंग दूर होण्यात आनंद आहे. तसेच हत्तीच्या सोंडेतील अडथळा दूर करण्यात रोहितच्या बाबांना यश आले यात वाचकालाही आनंद आहे.

शरद हा इडलीचे पीठ रगडण्याचे मेहनतीचे काम करून शिकतो आहे. आणि तरी शिकण्याची जिद्द न सोडता.

या सर्व कथा काही जीवनमूल्ये घेऊन शब्दांकित झाल्या आहेत. अगदी पहिल्या कथेपासून श्रममहिमा वाचकाचे मनावर ठसत जातो. हत्ती, गाय, वासरं, म्हशी,मांजर, पोपट हे सारे पर्यावरणातील घटक विविध कथांमधे हजर आहेत. त्यातून पर्यावरणरक्षण व पर्यावरणावरील प्रेम दिसून येते.

या कथांमध्ये तुमच्याच वयाच्या धडपडणाऱ्या, धाडसी, प्रतिभावान, संवेदनशील मुलांच्या जगण्याचा झगडा अतिशय प्रभावीपणे चित्रीत झाला आहे. त्यामुळे 'असंही जगणं असतं' ह्याचं वास्तववादी दर्शन या कथा वाचताना तुमच्या अनुभवास येईल.

पुस्तकाचे नाव : इंद्रधनु
लेखक : प्रा. सुहासिनी देशपांडे
प्रकाशक : नंदिनी प्रकाशन
पृष्ठसंख्या : ८८, किंमत : ₹ ८०/-

– यशवंतराव लेले (मार्गदर्शक –संत्रिका विभाग)
ज्ञान प्रबोधिनी,
५१४, सदाशिव पेठ, पुणे – ३०

आ ी-आजोबा आल्यावर, मिठी मारतोस घट्ट । 'गोष्ट सांगा' म्हणुन, करतोस आजोबांजवळ हट्ट ।।

भेट द्या : कोयना अभयारण्य – महाराष्ट्र, क्षेत्रफळ ४२३.५५ चौ. किमी., बंगाली वाघ, सांबरांसाठी, औषधी वनस्पतींसाठी
प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली.

विज्ञान प्रयोग

साहित्य – एक छोटी 'झिप लॉक' असणारी प्लॅस्टिक पिशवी किंवा फ्रिजमध्ये भाजी ठेवण्यासाठी असणारी पिशवी (पण तिला 'झिप लॉक' असलं पाहिजे), खायचा सोडा, व्हिनेगार, कोमट पाणी, टिश्यू पेपर, एक भांडं किंवा कप

सूचना – हा प्रयोग करताना स्वयंपाकघरात मोठ्या 'सिंक'मध्ये किंवा घराबाहेर करावा. गॅस चालू असेल त्या ठिकाणी हा प्रयोग करू नये.

प्रयोग – **१.** एक कप पाणी कोमट करून 'झिप लॉक'च्या प्लॅस्टिक पिशवीत ओता. **२.** त्या पाण्यात अर्धा कप व्हिनेगार टाका. **३.** टिश्यू पेपर घेऊन त्याच्या मध्यभागी ३ चमचे 'खायचा सोडा'ठेवा आणि टिश्यू पेपरची पुडी बांधा. **४.** 'झिप लॉक'ची पिशवी बंद करताना एका बाजूने थोडी फट ठेवा कारण त्यातून तुम्हाला 'खायचा सोडा' असलेल्या टिश्यू पेपरची पुडी आत टाकायची आहे. **५.** पुडी पटकन आत टाका. पिशवी पूर्ण बंद करा. फट ठेवू नका. **६.** ती पिशवी 'सिंक'मध्ये किंवा घराबाहेर ठेवा आणि लगेच लांब उभे राहा. **७.** त्या पिशवीचा आकार हळूहळू मोठा होईल. एकदम छोटा फटाका वाचल्यासारखा आवाज येईल, कदाचित पिशवी थोडी उडेल सुद्धा !

हे कसं घडलं? जेव्हा **'खायचा सोडा'** आणि **'व्हिनेगार'** एकत्र येतात तेव्हा त्यात आम्ल–अल्कली रासायनिक क्रिया होते. खायच्या सोड्यामध्ये अल्कली गुणधर्म आहेत तर 'व्हिनेगार' हे ॲसिटिक ॲसीड म्हणजे आम्ल आहे. या रासायनिक क्रियेमुळे कार्बनडाय ऑ साइड वायू तयार होतो. तो बंद पिशवीत अडकून राहतो. एका मर्यादेच्या बाहेर त्याचं पिशवीतील प्रमाण वाढलं, की तो बाहेर येऊ पाहतो आणि त्याचा छोटा स्फोट होतो. फटा यासारखा आवाज येऊन पिशवीतून तो बाहेर पडतो. कोमट पाणी घेतल्यामुळे रासायनिक क्रियेचा वेग वाढतो. 'खायचा सोडा' टिश्यू पेपरमध्ये गुंडाळल्यामुळे रासायनिक क्रिया सुरू व्हायला थोडा वेळ लागतो. तुम्हाला पिशवीपासून लांब जायला त्यामुळे थोडा अवधी मिळतो.

हे करून पाहा **१.** वेगवेगळ्या तापमानाचं पाणी घेऊन प्रयोग करा. कोणत्या तापमानाला रासायनिक क्रिया सर्वात जलद होते आणि कोणत्या तापमानाला रासायनिक क्रिया घडायला वेळ लागतो. **२.**'खायचा सोडा' आणि 'व्हिनेगार' यांचे प्रमाण कमी–जास्त करून किती वेळात रासायनिक क्रिया घडते आणि पिशवी फुटते ते बघा. **३.** रासायनिक क्रिया 'झिप लॉक' प्लॅस्टिक पिशवीच्या आकारावर अवलंबून आहे का?

दोस्तांनो, हे सगळं करताना जरा जपून करा हं !

– **डॉ. कांचनगंगा गंधे,** ४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030



मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्याचा भावार्थ
– भलेरी रुत आयी म्हारा देस में (राजस्थानी गीत)

हे बाजरीचे बी कोणी लावले? हे साखरेसारखे बाजरीचे गोड बी कोणी लावले? आनंदी ऋतू आज माझ्या देशात आले. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले. हिरवे हिरवे मनोहारी बाजरीचे शेत बहरूनी यावे. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले. रानावनात मोर नाचू लागला. कोकीळा गोड गीत गावू लागली. आनंदी ऋतू आज माझ्या देशात आले. शुभ ऋतू आज माझ्या देशात आले.

शोभेची काही फुलं बिनवासाची, तटस्थ। त्या-त्या वेळेच्या मनोभावनेत, सामावून जातात मस्त।।

भेट द्या : काझीरंगा राष्ट्रीय उद्यान – आसाम, क्षेत्रफळ ४३० चौ.किमी., एकशिंगी गेंडा, पक्षी निरीक्षणासाठी प्रसिद्ध

प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.

चौसष्ट घरांचा वि सम्राट - विश्वनाथन् आनंद

– मिलिंद ढमढेरे

'संयम, चिकाटी व जिद्द याला मानसिक कणखरपणाची जोड दिली तर अनेक अडचणींवर मात करीत आपले इप्सित ध्येय साकार करता येते', याचाच प्रत्यय बुद्धिबळाचा विश्वसम्राट विश्वनाथन् आनंद याने आपल्या खेळाद्वारे घडविला आहे. बुद्धिबळ या खेळात रशियन खेळाडूंचे वर्चस्व असताना अन्य देशांच्या खेळाडूंनी जग तेतपद मिळविणे म्हणजे मृगजळच मानले जात होते. 'भारतात बुद्धिबळाचे विश्वविजेते खेळाडू घडू शकणार नाहीत' ही रशियन बुद्धिबळ पंडितांनी इ.स. २००० मध्ये केलेली टीका किती खोटी आहे हे आनंदने पाच वेळा वि विजेतेपद राखत दाखवून दिले आहे.

भारतात क्रिकेट हा खेळ लोकांच्या नसानसात भिनला आहे. अशा भारतात बुद्धिबळाचे युग निर्माण करणे, ही काही सोपी गोष्ट नव्हती. बुद्धिबळ हा खरं तर आपला प्राचीन क्रीडाप्रकार मानला जातो. तरीही या खेळात कारकीर्द करणे हे पूर्वीच्या काळी अश यप्राय मानले जात होते. अतिशय प्रतिकूल आव्हानांना सामोरे जात आनंदने बुद्धिबळातही कारकीर्द करता येते हे दाखवून दिले. अनेक ग्रँडमास्टर व आंतरराष्ट्रीय मास्टर्स आपल्या देशात घडविण्यासाठी आवश्यक असणारी पा 'भूमी आनंदमुळे तयार झाली आहे, याबाबत कोणाचेही दुमत नाही.

कोणतेही यश सहजासहजी मिळत नसते. त्यासाठी कठोर परिश्रमांची आवश्यकता असते. आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी अभूतपूर्व यश मिळविले ते त्यांना सहजासहजी मिळालेले नाही. अफाट कष्ट करत व संघर्ष करत त्यांनी हे यश साध्य केले आहे.

सोफिया येथे २०१० मध्ये झालेल्या वि विजेतेपदाच्या लढतीच्या वेळची ही गोष्ट आहे. त्यावेळी युरोपात ज्वालामुखीमुळे निर्माण झालेल्या धुरामुळे विमानांची अनेक उड्डाणे स्थगित झाली होती. साहजिकच 'व्हॅसेलीन तोपालोव्ह'विरुद्धच्या लढतीकरिता वि नाथन् आनंद या भारतीय वि विजेत्यास फ्रँकफूर्ट ते सोफिया असा चाळीस तासांचा बस प्रवास करण्याखेरीज अन्य कोणताही पर्याय नव्हता. ही लढत दोन–तीन दिवसांनी पुढे ढकलावी ही आनंदची मागणी संयोजकांनी फेटाळली. चाळीस तासांचा गाडीप्रवास करुन आल्यानंतर केवळ एका दिवसाच्या विश्रांतीनंतर जग तेतपदाच्या लढाईत उतरणे हे केवळ आनंदच करू शकतो. प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेणे व विनयशीलता हा आनंदचा स्थायीभाव आहेच; पण या प्रसंगातून बुद्धिबळ खेळाशी तो किती बांधीलकी मानतो हे ही आपल्याला दिसून येते.

आनंदची देहबोली फ त बुद्धिबळासाठीच आहे. लहानपणी तो घरच्या लोकांबरोबर किंवा मित्रमंडळींशी गप्पागोष्टीत बुद्धिबळाविषयी भरभरून बोलायचा. आनंदला बुद्धिबळाची आवड वयाच्या सहाव्या वर्षीच निर्माण झाली. त्याचे वडील फिलीपाईन्समधे असताना तेथील स्थानिक स्पर्धांमधे त्याने भाग घेण्यास सुरुवात केली. लहानपणापासूनच बुद्धिबळाची अनेक पुस्तके वाचण्याचा सपाटा त्याने लावला. त्याची बहीण अनुराधा हिनेदेखील अनेकवेळा त्याला भेट म्हणून बुद्धिबळाचीच पुस्तके दिली. शाळेत असताना तो अभ्यासाबरोबरच बुद्धिबळाचा भरपूर सराव करायचा.

मे महिना सुट्टीचा, थंडगार मटका कुल्फीचा। उसाचा रस, वाळ्याचे पडदे, आंबे अन् घरगुती कुलरचा ॥

भेट द्या : गीर नॅशनल पार्क – गुजरात, क्षेत्रफळ १४१२ चौ. किमी., आशियाई सिंहांसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.

विश्वनाथन् आनंदला मिळालेले विशेष पुरस्कार

१९८५	–	अर्जुन पुरस्कार १९८७ – पद्मश्री पुरस्कार नॅशनल सिटीझन्स पुरस्कार
१९८८	–	भारताच्या ४० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित केलेल्या स्वातंत्र्य दौडीचे निमित्त राजीव गांधी सर्वोत्तम क्रीडापटू पुरस्कार
१९९१–९२	–	भारताच्या क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च समजला जाणारा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार–या पुरस्काराचाच पहिला मानकरी
१९९५	–	के.के. बिर्ला फाउंडेशनतर्फे वर्षातील सर्वोत्तम नागरिक पुरस्कार
१९९८	–	ब्रिटीश बुद्धिबळ महासंघातर्फे सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार
१९९८	–	स्पोर्टसस्टारतर्फे शतकातील सर्वात महान खेळाडू पुरस्कार
२०००	–	पद्मभूषण – (जागतिक स्पर्धा जिंकणारा पहिला आशियाई बुद्धिबळपटू होण्याच्या कामगिरीबद्दल
२००१	–	स्पेनमध्ये लँझारोट शासनातर्फे जेमिओ डीओरो पुरस्कार
२००७	–	पद्मविभूषण (जागतिक स्पर्धेतील विजेतेपद व जागतिक मानांकन पहिले स्थान मिळविल्याबद्दल)
२०११	–	नॅसकॉमतर्फे ग्लोबल स्ट्रॅटेजिक पुरस्कार

बुद्धिबळातील ऑस्कर पुरस्कार – १९९७, १९९८, २००३, २००४, २००७, २००८

अर्थात अभ्यासातही तो सतत पहिल्या पाच क्रमांकांमध्ये असे. आनंदने शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थापन पदवीचा अभ्यासक्रमही पूर्ण केला. त्यावेळी आईवडिलांनी खेळात कारकीर्द करायची की नोकरी करायची असे दोन पर्याय आनंदला दिले. तोपर्यंत आनंदची बुद्धिबळाची कारकीर्द बहरत चालली होती. सहाजिकच त्याने बुद्धिबळाचाच पर्याय निवडला. आई–वडिलांनी आपल्यासाठी जे काही केले आहे; त्याचे उत्तरदायित्व आपल्यावर असते असे तो नेहमीच म्हणत असतो. आणि हे ऋण फेडण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतो.

बुद्धिबळात सर्वोच्च यश मिळविण्यासाठी भावनिक संतुलन खूप महत्त्वाचे असते. शरीर तंदुरुस्त असेल तर आपोआप मनही स्थिर असते हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवीत आनंद नियमित व्यायाम करतो; तसेच एकाग्रता टिकविण्यासाठी ध्यानधारणा व योगासने करतो. यश मिळविण्यासाठी असलेली दुर्दम्य इच्छाश ती, स्वयंशिस्त, आत्मनिर्भरता, संयम व उत्साहाचा अखंड झरा यासर्वांच्या जोरावरच आनंदने जागतिक कीर्ती मिळविली आहे. पाच वेळा वि विजेता होऊनही आनंदचे पाय जमिनीवरच आहेत. उदयोन्मुख खेळाडूंना मार्गदर्शन व मौलिक सूचना देण्याबाबत तो आढेवेढे घेत नाही. आनंद हा अजूनही जागतिक स्तरावर खेळत आहे. त्यामुळेच त्याने गुरुपद अद्याप स्वीकारलेले नाही.

प्रत्येक खेळाडूप्रमाणे आनंदच्या कारकिर्दीतदेखील चढ–उतार आले. कधी प्रशंसा तर कधी प्रखर टिकेला त्याला सामोरे जावे लागले. तरीदेखील दोन्हीबाबत त्याची संयमित प्रतिक्रिया असते. 'टीकाकारांना आपण आपल्या खेळानेच उत्तर देणार', असाच त्याचा बाणा असतो.

बोरिस गेल्फंडविरुद्धच्या जागतिक अजिं यपदाच्या लढतीमधील टायब्रेकर सुरू होण्यापूर्वीही त्याच्यावर टीका झाली. तथापि संयम व शांतपणे आपण खेळत

स्वप्नेही सुंदर काळोखातच दिसती। काळोख काजवे सहप्रवासी होती।।

भेट द्या : नारायण सरोवर अभयारण्य – गुजरात, क्षेत्रफळ ४४४.२३ चौ. किमी., चिंकारा हरणांसाठी प्रसिद्ध
प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.

राहिलं की, यश आपोआप आपल्याकडे चालून येतं हे त्याने दाखवून दिलं. याच लढतीमधील टायब्रेकरमधील तिसऱ्या डावात आनंदपुढे पराभव दिसत होता. त्याच्या राजापुढील तटबंदी केव्हाच उद्ध्वस्त झाली होती. त्यावेळी अन्य दुसरा खेळाडू असता तर त्याने केव्हाच डाव सोडून दिला असता. तथापि आनंद हा अतिशय लढवय्या खेळाडू आहे. 'हारना मना है!' हेच त्याने मनाशी ठरविले होते. शेवटपर्यंत संयम कायम ठेवत त्यानं विजय मिळविला.

'आपल्या देशात सर्व ठिकाणी बुद्धिबळाचा प्रसार होणे हाच आपला सन्मान आहे व तेच आपल्यासाठी मोठे पारितोषिक आहे' असे तो नम्रपणे सांगतो. बुद्धिबळाच्या जागतिक अजिं यपदाच्या विविध स्पर्धांमध्ये वि विजेतेपद मिळवित त्याने आपले चतुरस्त्र कौशल्य सिद्ध केले आहे. बाद फेरीची स्पर्धा, मॅच स्वरूपाची स्पर्धा व जलद स्वरूपाची स्पर्धा अशा विविध स्वरूपाच्या स्पर्धांमध्ये त्याने आपला अव्वल दर्जा सिद्ध केला आहे. प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या आनंदने कधीही आर्थिक मोबदला मिळविण्याकरिता आपले तत्त्व सोडले नाही. आपला देश व देशासाठीचे

खेळणे याच गोष्टींना तो कायम प्राधान्य देत आला.

अव्वल दर्जाचे खेळाडू कधीही अल्पसंतुष्ट नसतात. ते सतत अधिकाधिक यश मिळविण्याचे लक्ष्य ठेवीत सराव करतात. अशाच जिद्दीने बुद्धिबळाच्या क्षेत्रात आनंदची वाटचाल अजूनही जोमाने सुरू आहे.

मिलिंद ढमढेरे
प्लॉट क्र. ६९, 'गोपाळ निवास',
तुळशीबागवाले कॉलनी, सहकार नगर, पुणे - ९

विद्यार्थी विशेषांक

आहे ना लक्षात ...

छात्र प्रबोधनच्या विद्यार्थी विशेषांकासाठी (सौर आषाढ, जुलै २०१४) खालील साहित्य प्रकारातील वैविध्यपूर्ण, सकस साहित्य मागवण्यात येत आहे.

- **कथा, कविता, ललित**
- **मुलाखत** - तुमच्या गावातील पाणी पुरवठा, कचरा, सांडपाण्याचे व्यवस्थापन यांसारख्या कोणत्याही एका समस्येचा अभ्यास करा. त्याच्याशी संबंधित प्रशासकीय अधिकारी/त्या संदर्भात काम करणारा सामाजिक कार्यकर्ता यांची मुलाखत घ्या. त्या समस्येचे व मुलाखतीचे तुम्ही शब्दांकन करा.
- **अनुभवपर** - 'त्यावेळी मी बोलायला हवं होतं...' अनेकदा आपण भीती, संकोच, चूक दडवण्याची धडपड यांमुळे स्पष्ट बोलत नाही. त्याची परिणती काही वेळेला गैरसमज होणं, मैत्री-माणसं तुटणं, वचित प्रसंगी न केलेल्या चुकीला आपल्याला जबाबदार धरलं जाणं; अशाप्रकारे होते. ...वेळीच बोललो असतो/बोलले असते तर... असं त्यावेळी अगदी मनापासून वाटतं. असाच तुमचा एखादा अनुभव शब्दबद्ध करा. शब्द मर्यादा ३०० ते ५०० शब्द.
- नावीन्यपूर्ण, मौजमजेचे, पटकन खेळता येणारे सामूहिक खेळ
- मुखपृष्ठासाठी चित्र

साहित्य व चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक २० मे २०१४

कुठूनसे अवतरती नभी असंख्य पक्षी। इकडून तिकडे जाई, ती गाणारी नक्षी ।।

भेट द्या : सागरी राष्ट्रीय उद्यान – गुजरात, क्षेत्रफळ १६२. ८९ चौ. किमी., भारतातील पहिले सागरी पार्क, अलगी व कोरल्स्साठी

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटे ट प्रा. लि., पुणे.

ते चार शब्द...

शाळेत असताना एकदा आमच्या मराठीच्या सरांनी निबंध स्पर्धा घेतली. मीही सहभाग घेतला होता. निबंधही लिहिला होता. आज निबंधाचा विषय मात्र आठवत नाही आणि त्या निबंधात काय लिहिले होते तेही आठवत नाही. न कीच मी फारसं चांगलं लिहिलेलं नसणार. माझा निबंध वाचून सर नाराज होऊन खूप काही बोलले. मात्र आजही आठवतात सरांनी ओरडून बोललेले चार शब्द... 'निबंध लिहायची अ कल नाही.' निबंधाचा तो कागद त्यांनी रागाने दूर सारला. त्यानंतर मात्र मी निबंध, पत्रलेखन यांची धास्तीच घेतली. परीक्षेपुरते पाठांतर केलेले निबंध, पत्रलेखन लिहून गुण मिळवले. लिहिण्याच्या कुठल्याच स्पर्धेसाठी साधे नाव देण्याचीही हिंमत केली नाही.

हा प्रसंग आठवण्याचे कारण म्हणजे नुकताच घडलेला दुसरा प्रसंग. एका व्याख्यानासाठी पत्रकार, संपादक, लेखक श्री. संजय आवटे यांना निमंत्रित केले होते. काही दिवसांनी मी त्यांना आभाराचे पत्र लिहिले. माझे पत्र मिळाल्यानंतर त्यांनी मला फोन केला. खरंतर मोबाईल स्क्रीनवर त्यांचे नाव बघूनच मला आश्चर्याचा ध का बसला. त्या छोट्याशा संवादात ते म्हणाले, ''तुमच्यात लेखक दडलेला आहे.''

पुन्हा एकदा चार शब्द. मला माझ्या कानांवर विश्वास बसेना. त्यांच्या बोलण्यात विश्वास होता. उभारी होती. धैर्य होते. मधल्या काळात मी अनेक परीक्षा दिल्या होत्या. पुस्तकांशी दोस्ती झाली होती. भरपूर आत्मविश्वासाने माझ्या विद्यार्थ्यांना मी शिकवत होतो. तरीही का कोण जाणे मला पुन्हा पुन्हा आठवत होते शाळेतल्या सरांचे ते चार शब्द 'निबंध लिहायची अ कल नाही.'

मी काय लिहावे? हे मलाही कळत नव्हते. त्यांनीच मला सुचविले 'तुम्ही तरुणांमध्ये राहता, त्यांच्याविषयी काहीतरी लिहा.' मी खूप विचार केला. शाळेतल्या त्या चार शब्दांना खोलवर पुरलं आणि नवीन चार शब्द पुन्हा पुन्हा आठवू लागलो.

'तुमच्यात लेखक दडलेला आहे'... 'तुमच्यात लेखक दडलेला आहे'... खूप खूप वाचन केले. मग लिहिण्याचे नियोजन केले आणि लिहायला सुरुवात केली. दररोज थोडे थोडे करून लिहीत गेलो. लिहिण्यात आत्मविश्वास येत गेला. च क चाळीस दिवसांत एकोणीस ललित निबंध लिहून झाले.

ठरल्याप्रमाणे हस्तलिखित श्री. संजय आवटेंना पाठवले. दोन महिन्यांनी त्यांचा मेल आला. मी मेल वाचलेलाच नव्हता. त्यांनी फोनवरून मला मेल बॉ स तपासायला सांगितला. मेल वाचून माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. मेल होता...

''आम्ही आमच्या अभ्यास मंडळाकडून आपले पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय घेतलेला आहे.''

सारे अविश्वसनीय ! माझ्या 'तरुवाद' या पहिल्या पुस्तकाचा जन्म झाला. आवटे सरांचे ते चार शब्द खरे ठरले. माझ्यातला दडलेला लेखक व्य त झाला. पहिल्या प्रसंगात चूक माझीच होती. सरांची चूक नव्हती. ते माझ्या विषयीच्या कळकळीपोटीच मला रागावले होते. निबंध लिहिण्याची कला अवगत करण्याऐवजी मी धास्ती घेऊन बसलो. 'निबंध लिहायची अ कल नाही' हे चार शब्द खोटे ठरवायला 'तुमच्यात लेखक दडलेला आहे' या चार शब्दांचीच मदत झाली हे मात्र खरे!

सुनील पाटील
इमेज अ‍ॅकॅडमी, संजीवनी संकुल,गोळे कॉलनी,
अशोक स्तंभ, नाशिक-२

शब्द समजून घ्या, शब्द उमजून घ्या। हवा तिथे, हवा तेव्हा, नि:शब्दाला मान दया।।

भेट दया : अच्छाबल अभयारण्य – जम्मू काश्मीर, क्षेत्रफळ ०.५० चौ. किमी., हिमालयीन अस्वले व इतर प्राण्यांसाठी प्रसिद्ध

नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

लेह ते खारदुंग ला
एक सायकल सफर !!

– मिलिंद कुलकर्णी

हिमालयीन निसर्गसौंदर्याच्या वेडापायी अनेकदा ट्रेकिंग केल्यानंतर, मिलिंद कुलकर्णी यांनी जगातल्या सर्वोच्च उंचीवरील खडतर अशा १८,३८० फूटांवरील खारदुंग ला खिंडीपर्यंत सायकल प्रवास करण्याचे ठरविले. यासाठी पुण्यात सिंहगड, ताम्हिणी घाट इ. ठिकाणी भरपूर सराव केला. अखेर मिलिंद कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी लेह ते खारदुंग ला या सायकल सफरीस सुरवात केली व ती यशस्वीपणे पूर्ण केली. वाचूया, या सफरीचा चित्तथरारक अनुभव मिलिंद कुलकर्णी यांच्याच शब्दात..

दि. ३१ ऑगस्टला सकाळी ६ वाजता आम्ही मंडळी सायकलवर स्वार झालो नि 'सा ती कॅम्प'कडे वेगाने निघालो. या अत्युच्च भागातील लहरी हवामानाचा वातावरणाचा सराव व्हावा म्हणून आम्ही तीन दिवस आधीच विमानाने लेहला आलो. (लेह हे १०,५०० फूट उंचीवर आहे.) अशी काळजी घेतल्याने तुलनेने विरळ हवेच्या भागाशी जुळवून घेता येऊ लागले. लेहपासून सा ती ७१ कि. मी. अंतरावर आहे. प्रारंभीचा रस्ता उताराचा व चांगला होता. त्यामुळे एक ठरावीक गती राखत आम्ही मंडळी दुपारी दोनच्या सुमारास सा ती (उंची १२, ५०० फूट) कॅम्पवर पोहोचलो. सा तीला मु काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी तांगत्सेकडे आम्ही कूच केले. यासाठी 'चांग ला खिंड' पार करायची होती. तेथील उंची सा तीपेक्षा ५ हजार फुटांनी अधिक होती. (१७,३०० फूट) रस्ता पूर्ण घाटाचा (चढणीचा). लडाखचे विचित्र म्हणतात ते हवामान आम्हाला अनुभवास येऊ लागले. सकाळी ९ वाजताच उन्हाचा चटका जाणवू लागला. हवा अधिकाधिक विरळ होऊ लागली. 'लडाखमध्ये सायकल चालविणे म्हणजे दिव्यच,' असे लोक का म्हणतात हे आम्हाला समजून आले. वारंवार दम लागू लागला. शरीरातील पाण्याची पातळी कायम राखण्यासाठी एकसारखे पाणी प्यावे लागत होते. ही कसरत चालू असतानाच एका बाजूला उंचच उंच डोंगर तर दुसऱ्या बाजूला खोल-खोल दऱ्या, दूर वाहणारी सिंधू नदी दिसत होती!! विसाव्यासाठी थबकताच हे सारे निसर्गसौंदर्य खिळवून ठेवत होते.

बनियन, थर्मलवेअर, टीशर्ट, स्वेटर व त्यावर जाकीट असे या प्रवासात अंगात कपड्यांचे ५ थर घालावे लागत होते. डो याला बँड गुंडाळून त्यावर कानटोपी व त्यावर हेल्मेट, हातात ग्लोव्हज ! सायकल चालवताना दम लागल्यावर थांबले तर घामाची जागा लगेच थंडी घेई. यामुळे हा पंचस्तरीय पोशाख घालण्यापासून सुटका नव्हतीच !

विलोभनीय निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत आपल्या लक्ष्याकडे मजल दरमजल करत असताना प्रथम 'झिंग्राल' या ठिकाणी पोहोचलो. तेथे थोडे चहापान व विश्रांतीनंतर आम्ही सायकली तांगसेच्या दिशेने सोडल्या. दुपारी 'चांग ला खिंड' येथे पोहोचलो. चांग ला खिंडीवरून दरबुक गावाकडे जाणारा रस्ता तसा आगळावेगळाच होता. पहिले २६ कि.मी. अंतरापर्यंत तो रस्ता उताराचाच होता. आता निसर्गाने आपले सुंदर रूप आणखीनच देखणे केले होते. खोलवर दिसणारी सिंधू नदी, रूंदावलेल्या पात्रासह एका बाजूने आमच्या बरोबर धावत होती. सुमारे १५ कि.मी. पर्यंत तिची साथ होती. अनेक लहान-मोठे

कधी प्रवाह तोडित, मार्गक्रमित जाईन। मम आस मनि, हा पैलतीर गाठीन।।

भेट द्या : हिरपोरा वाइल्डलाइफ अभयारण्य – जम्मू काश्मीर, क्षेत्रफळ ३४१ चौ. किमी.,अस्वले व तिबेटियन कोल्ह्यांसाठी
प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.

पेंगॉग सरोवर

पूल ओलांडले, काही वेळा नदीच्या पात्रातून सायकल पार करत प्रवास चालू ठेवावा लागला. थोड्या वेळाने सिंधू नदी दिसेनाशी झाली नि दरबुक हे गाव दिसू लागले. आता उतार तीव्र होता. रस्त्यात दगडधोंडे येत होते. वाटेत वाळूही पसरलेली होती. त्यामुळे अत्यंत सावधपणे सायकल हाकावी लागत होती. दरबुक नंतर ५ कि.मी. अंतरावर तांगसे गाव आहे. हा भाग अतिशय सुंदर आहे. चारही बाजूनी त्याला डोंगरांनी वेढलेलं आहे. आमच्या कॅम्प शेजारूनच नदी वाहत होती.

रात्रीच्या मु कामानंतर दुसऱ्या दिवशी पेंगॉग सरोवराच्या दिशेने निघालो. (उंची १५,००० फूट) पुन्हा एकदा सिंधू नदीने दर्शन दिले व काही काळ ती पुन्हा आमच्या सोबत धावत निघाली. तिचं पात्र येथे खूपच विशाल होतं. रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सपाट भागात अनेक ठिकाणी जमिनीला भोके-भोके पडलेली दिसली. ती मॉरमाँट या प्राण्यांची आहेत हे कळले. त्यानंतर मॉरमाँटचे प्रत्यक्ष दर्शन घडले. ते प्राणी खूपच मनोहारी होते. असा रम्य प्रवास करत तांगसेपासून ४५ कि. मी. अंतरावरील पेगॉग सरोवरापाशी कधी पोहोचलो हे कळले नाही. तो निळाभोर विशाल जलसागर पाहून देहभान विसरलो. निसर्ग काही भागांत सौंदर्याची कशी मु तहस्ते उधळण करतो याचाच प्रत्यय यावेळी आला. जगातल्या ज्या स्थळांना आयुष्यात एकदा तरी भेट देण्याचा माणूस संकल्प सोडतो, त्यापैकी हे एक स्थळ आहे.

हे सरोवर भारत व चीनच्या दरम्यान आहे. पुढे चीनची सीमा आहे. हा स्वर्गीयसुंदर भाग मनसो त पाहून सायकली पुन्हा 'चांग ला खिंडी'वरून सा तीच्या दिशेने वळवल्या. सा तीला संध्याकाळी पोहोचलो तेव्हा लख्ख प्रकाश होता. कॅम्पवरून लांबपर्यंतचा रस्ता व त्यावरची ये-जा करणारी वाहने दिसत होती. रात्री पहिल्या प्रहरीही आकाश निरभ्र होते. आता रात्रभर आकाशाचे सुंदर निरीक्षण करता येणार असे वाटत असतानाच तिथे पाऊस सुरू झाला. तो सकाळी ८-३० पर्यंत पडत होता. समोर पाहिले तर भोवतालच्या डोंगरावर मोठी बर्फवृष्टी झाल्याचेही दिसून आले.

पाऊस थोडा थांबल्यावर पुढील प्रवासासाठी सायकलींवर स्वार झालो. वारी ला खिंड हा आणखी एक सुरेख भाग मागे टाकत 'अगम्य' या गावी मु कामास आलो. या बर्फाळ, अतिउंचीच्या भागात वालुकामय टेकड्याही पाहायला मिळाल्या. थोडे पुढे गेल्यावर शोवॉक व सिंधू या दोन नद्यांचा पवित्र संगम पाहायला मिळाला आणि ते सुंदर व विशाल पात्र पाहून पुन्हा एकदा मन हरखून गेलं. दुसऱ्या दिवशी अगम्यवरून सुमुरला रात्री मु कामाला आलो.

त्यानंतर सकाळी पुन्हा सुमुरवरून खालसरला आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा लवकरच सायकलला गती देत खालसर गावावरून खारदुंग ला कडे कूच केले. खालसर वरून खारदुंग ला २४ कि.मी. चा रस्ता. हा रस्ता घाटाचा होता. ५ तासांच्या सायकल प्रवासानंतर खारदुंग ला येथे पोहोचलो. हे गाव १४,००० फूट उंचीवर वसलेले आहे. एकाच वेळी थंडीचा कडाका, उन्हाचा तडाखा, बोचरा वारा सर्वांनी जोरदार स्वागत केले. खारदुंग ला गाव हा लक्ष्यपूर्तीपूर्वीचा अखेरचा मु काम होता. जेवढी विश्रांती घेता येईल ती घेत, शरीर तंदुरुस्त ठेवत स्वत:ची काळजी घेतली. आता लक्ष्य समीप आले होते. ते साध्य करण्याची हुरहूर मनात लागून राहिली होती.

आदल्या दिवशी झोप अशी लागलीच नाही. तरीही

डोंगरांनी वेढलेले तांगसे गाव

भेट द्या : नामदफा राष्ट्रीय उद्यान - अरुणाचल, क्षेत्रफळ १९८५.२३ चौ. किमी., लाल रंगाची उडणारी खार व रेड पांडासाठी

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून 'पंचस्तरीय' पोशाख अंगावर चढवून सायकलींवर स्वार झालो. आता अंतिम लक्ष्य होते खारदुंग ला खिंड; जी जगातील सर्वोच्च उंचीच्या रस्त्यावरील खिंड म्हणून प्रसिद्ध आहे (Highest motorable road in the world). ती १८, ३८० फूट उंचीवर आहे. आता एका अत्यंत अवघड व खडतर अशा टप्प्यातून पुढे जायचे होते. खारदुंग ला गावापासून खारदुंग ला खिंडीपर्यंतच्या रस्त्याचे अंतर हे ३६ कि.मी. आहे. प्रवास पूर्णत: चढणीचा होता. सायकल चालविताना प्रचंड दम लागत असे. याचे एक कारण म्हणजे अती उंचीमुळे जाणवणारी प्राणवायूची कमतरता. १९ कि.मी. अंतरावरील नॉर्थ पुल्लू (उंची साधारण १५,२०० फूट) या ठिकाणी आमच्या अपेक्षेपेक्षा लवकर म्हणजे सकाळी ८.३० च्या सुमारास आम्ही पोहोचलो.

आता रस्ता गायब झाला होता. सर्वत्र बर्फाचे पाणीच पाणी पसरले होते. रस्त्यावरील खाचखळगेही पाण्याने भरलेले होते. त्यामुळे सायकल खूपच जपून चालवावी लागत होती. अती उंचीवरील चढणीमुळे व दमछाकीमुळे अत्यंत

धिम्या गतीने अक्षरश: फुटा-फुटाने पुढे सरकावे लागत होते. आमच्यासाठी हा रस्ता फारच आव्हान देणारा ठरला.

अखेरीस सुमारे सव्वा पाच तासांच्या सायकल प्रवासानंतर खारदुंग ला ची खिंड आम्ही गाठली. वयाच्या ५५ व्या वर्षी घेतलेल्या कठोर मेहनतीचे सार्थक झाले होते. अक्षरश: स्वप्नवत वाटणारी गोष्ट प्रत्यक्षात घडली होती.

- मिलिंद कुलकर्णी
'ऋतुराज, ४४/५८, नवसह्याद्री हौ. सोसा., कर्वेनगर, पुणे

ज्ञान प्रबोधिनी मानसशास्त्र विभाग (प्रज्ञामानस संशोधिका)

सादर करीत आहे मानसशास्त्रातील विविध अभ्यासक्रम

शिक्षक, डॉ टर, कौन्सेलर, सामाजिक कार्यकर्ते, पालक, मानसशास्त्राचे विद्यार्थी, इतर व्यावसायिक आणि मुलांसोबत काम करू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी...

बाल व किशोरांचे मानसशास्त्र : क्षमता संवर्धन
पत्रव्यवहाराद्वारे करण्याजोगा, स्वायत्त अभ्यासक्रम
मुदत : सहा महिने **माध्यम :** इंग्रजी आणि मराठी

शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम
(पुणे विद्यापिठाशी संलग्न)
मुदत : एक वर्ष **माध्यम :** इंग्रजी आणि मराठी

POST GRADUATE DIPLOMA IN EDUCATION OF THE GIFTED : METHODS AND STRATEGIES
Granted by UGC, New Delhi / Approved by University of Pune

ATM : This course aims to orient the candidate about Identification of 'Giftedness' (High Potential) in children and to channelize the quality minds for good purpose. The candidate will be able to Guide, Counsel, Train and Nurture the Gifted Children.

DURATION : One Year **MEDIUM :** English

सर्व प्रवेश सुरू : १ जून २०१४ पासून

नावनोंदणी संपर्क : ज्ञान प्रबोधिनी मानसशास्त्र विभाग (प्रज्ञामानस संशोधिका), ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०
वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.००
दूरभाष : ०२० - २४२०७१४२/८०८७०९९९०७ **इ-मेल :** gauri.gharpure@jnanaprabodhini.org

JPIP is registered under UGC-U/SZ(1).12(B) of UGC Act 1956, University of Poona, Section 46, University Act, 1974

अपराधाला क्षमा असावी, शापाला उ:शाप। पुण्याईच्या रवि-तेजाने, जळून जावे पाप।।

भेट द्या : पुलिकत लेक पक्षी अभयारण्य - आंध्रप्रदेश, क्षेत्रफळ ३२७.३३ चौ. किमी., फ्लेमिंगोज पक्ष्यांसाठी प्रसिद्ध।।

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

प्रतिसाद

– कविता मेहेंदळे

डर् ऽऽऽ डर् ऽऽऽ डक् ऽऽ डक्ऽऽ डर् ऽऽ ढोलकं वाजवून झालं, की पुढच्या पाच-सहा मिनिटांत डोंबाऱ्याचा खेळ सुरू व्हायचा. गावातल्या लोकांना ठाऊक झालेलं होतं, हा खेळ रविवारी आणि गुरुवारी संध्याकाळी असतो. नीलावती नदीच्या पलीकडच्या मोकळ्या जागेवर हा खेळ तासभर चालतो. चट्‌ट्यापट्‌ट्याची उंच जोकर टोपी घालून मारूती झाडाखाली ढोलकं वाजवीत बसायचा. मारूतीजवळ त्याची सात-आठ वर्षांची मुलगी जया, डफली वाजवीत बसायची. जया नुकतीच शाळेत जायला लागली होती. झालं होतं असं, की शितूत सर घरा-घरातून जाऊन 'मुलांना शाळेत पाठवा. मुलं शिकतील तर संपूर्ण कुटुंबाला फायदा होईल', असं बरंच काही पटवायचे. जयाला धाकट्या भावाला सांभाळावं लागायचं; त्यामुळे ती शाळेत जाण्याचा प्रश्नच नव्हता; परंतु सरांनी जयाला पाहिलं आणि जयाला शाळेत पाठविण्याबाबत मारूतीला विनंती केली. जया शाळेत जायला लागली. मात्र या डोंबारी खेळासाठी गुरुवारचे शाळेचे खेळाचे दोन तास बुडवून ती लवकर घरी यायची. या दोघांबरोबर खेळासाठी त्यांचा टि कू

ते बोलू देत काही, मी बोलणार नाही। शब्दात भाव माझा, मी तोलणार नाही।।

भेट द्या : दांपा टायगर रिझर्व्ह – मिझोराम, क्षेत्रफळ ५५० चौ. किमी., वाघांसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**

असायचा. हाफ चड्डी घातलेला टि कू म्हणजे बघणाऱ्यांचं आकर्षण होतं. हे टि कू माकड प्रेक्षकांसमवेत बॉल खेळायचं. सायकल चालवून दाखवायचं. शाळा सुटल्यावर शाळकरी मुलं आणि रस्त्यावरून जाणारे येणारे किमान पाच मिनिटं तरी तिथे हमखास डोकावत.

आजही मारुतीनं त्याच्या पद्धतीनं खेळ सुरू केला. सतरंजी अंथरली आणि त्यावर कोलांटया उड्या मारल्या. डो यावर म्हणजे उलटं उभं राहाणं (शीर्षासन) झालं. हातांवर चक्राकार फिरून उड्या मारणं, नवीन पाहणाऱ्याला विस्मयचकित करीत असे. त्यानंतर मारुतीचा 'ब्रेक' असायचा. ब्रेक म्हणजे बाजा (माऊथ ऑर्गन) वाजवणं.

यानंतर टि कू रंगमंचावर यायचा. मारुती त्याला म्हणायचा, ''टि कू, तू माझा दोस्त आहेस ना, तर मग माझ्यासारखा दोन पायांवर उभा राहा न् हे केळं खा बरं.''

टि कू लगेच दोन पायांवर उभा राही आणि पुढच्या पायांनी केळं सोलून खाऊ लागे.

या पुढचा कार्यक्रमही ठरलेला होता. त्याप्रमाणे मारुती, टि कू आणि पाठोपाठ जयाने पेटत्या रिंगमधून पलीकडे उड्या मारल्या. शेवटी श्वास रोखून धरायला लावणारा खेळ सुरू होणार होता. जया दोरीवरून चालणार होती.

वीस मीटर अंतरावर दोन खांब रोवलेले होते. मारुतीनं छोट्या स्टुलावर उभं राहून दोन्ही खांबांवर बांधलेली दोरी घट्ट आहे ना, याची खात्री करून घेतली. जयाने सर्वांना वंदन केलं आणि मग मारुतीनं तिचे डोळे रुमालानं बांधले. बंद केले. 'पायंडा' म्हणजे पायामध्ये दोरीचा वेढा घेऊन नारळाच्या किंवा सुपारीच्या झाडावर चढतात तशा पद्धतीनं जया एका खांबावर चढली. पायातला पायंडा काढला आणि उभी राहिली. मारुतीनं तिच्या हातात काठी दिली. अंदाज घेत, तोल सावरीत जयाचं एकेक पाऊल दोरीवरून पुढे सरकू लागलं. मारुती संथपणे ढोल यावर थाप द्यायचा. त्या तालावर जयाचं पाऊल पडायचं. जयाची एकाग्रता महत्त्वाची होती. हा प्रयोग पाहताना आपोआपच शांतता असायची. आठवड्यातली गुजराण या दोन खेळांवर होत असे. लहान वयातच जयाला घरच्या आर्थिक परिस्थितीची जाणिव झालेली होती.

आजही जया नेहमीप्रमाणे आत्मविश्वासानं पावलं टाकीत होती. अचानक काय झालं कोणास ठाऊक जयाचा अंदाज चुकला आणि तिचा तोल गेला. ती स्वत:ला सावरू शकली नाही. जया धाडकन खाली पडली.

''अरेरे! ... ती बघ पोरगी पडली.''

''बापरे! काय झालं हे?''

''जिवावर बेततात असले हे खेळ! निस्तरा आता'' हे आणि अशा तऱ्हेचे उद्‌गार कानावर येत होते.

जयाच्या डाव्या गुडघ्याला जखम झाली होती. र त येत होतं. डावा हात तिनं घट्ट धरून ठेवला होता. तोही दुखत होता. हमसून हमसून जया रडत होती.

मारुतीने तिच्या पाठीवर हात ठेवला. जवळची माती उकरून तो, ती माती जखमेवर लावणार इत यात कुणीतरी त्याला हटकलं,

''अरे, काय करतोयस हे?''

''जखमेवर माती लावतो. बरं वाटेल.''

''डोकं फिरलंय का तुझं? अशानं रोगजंतू जखमेत शिरतील. तिला डॉ टरांकडे न्यायला हवं.''

''आम्हा गरीबांना असली चैन परवडत न्हाई साहेब.''

''चल तर मग. तिला घेऊन बैस स्कूटरवर,'' म्हणत त्या गृहस्थानं गाडी सुरू केली. जयाला डॉ टरांकडे दवाखान्यात नेलं. हाताला बारीक क्रॅक होता तिथे प्लॅस्टर घातलं. पायाला ड्रेसिंग केलं. जखम खोल होती. डॉ टरनी इंजे शन, औषधं दिली. हे सर्व उपचार होईपर्यंत तो गृहस्थ तिथे उभा होता. त्यानंतर मात्र डॉ टरांचे बिलाचे पैसे चुकते करून तो घाईघाईने निघून गेला. मागे वळूनही न पाहता. पदरचे पैसे घालून इलाज करून देणाऱ्या त्या भल्या गृहस्थाचं नाव विचारायचं, त्याचे आभार मानायचे राहूनच गेले, अशी चुटपूट

मोहरलेल्या आंब्याखाली, शीतलशा छायेत निजावे। उग्रमधुर गंधाचे आसव सर्वांगांनी पिऊन घ्यावे।।

भेट द्या : चिल्का पक्षी अभयारण्य – ओरिसा, क्षेत्रफळ ३५६० चौ. किमी., हिवाळी स्थलांतरित पक्ष्यांसाठी प्रसिद्ध

प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.

मारुतीला लागली. जया अजूनही मुसमुसत होती. दोघेही खेळाच्या जागी आले. टि कू माकड सामानाची देखभाल करीत थांबले होते. त्याला घेऊन सगळेच घरी गेले. या प्रसंगानंतर डोंबाऱ्याचा खेळ बंद पडला. मारुती स्टँडवर हमाली करायला लागला.

जया मन लावून अभ्यास करत होती. सुट्टीमध्ये छोट्या गोष्टी तयार करून घरखर्चाला मदत करण्याची तिची खटपट चालू होती. मे महिन्याच्या सुट्टीमध्ये पापड लाटणं, कार्यालयात भाज्या निवडणं असली कामं जया आपणहून करीत असे. गणेशोत्सवासाठी शोभिवंत माळा तयार करणं, राखीपौर्णिमेसाठी राख्या करणं तिला फार आवडायचं. असली कलाकुसर चांगले पैसे मिळवून देई. दिवाळीची सुट्टी लागली, की तिची आकाशकंदील करायला सुरुवात व्हायची. पणत्या रंगवून त्यासुद्धा घरोघरी जाऊन ती विकत होती.

एका घरासमोर दोनदा आरोळी देऊनही कुणी बाहेर आलं नाही. आतून एका पुरुषाचा आवाज आला, ''पुढे व्हा. आम्हाला पणत्या नकोयत. कटकट करू नका इथे.'' जया क्षणभर थांबली. पुढे न जाता त्याच अंगणात शिरून जयाने त्या घराची बेल वाजवली. आतमधले गृहस्थ थोड्या घुश्शातच बाहेर आले व म्हणाले, ''का, का त्रास देताय? पणत्या नकोयत असं सांगितलेलं कळत नाही?''

''पण असं का?'' जयानं विचारलं.

''तुला त्याच्याशी काय घेणं आहे?'' गृहस्थांच्या कपाळावर आठ्या.

''खरंच काही घेणं नाही. माफ करा मला साहेब; पण दिवाळी मोठा सण. आनंदाचा सण...''

''कुणासाठी साजरा करायचा? मुलं अमेरिकेला...''

''असेना साहेब! त्यांची दीपावली तिकडे, आपली इकडे..''

''तू निघतेस का आता? मला शहाणपण शिकवू नकोस.''

''चाललेच आहे; पण या सहा पणत्या तेवढ्या ठेऊन घ्या. साहेब, दिवाळीच्या दिवशी या पणत्या अंगणात लावा. तुम्हालाही बरं वाटेल.''

''काय वाटतंय ते माझं मी बघतो. तुला पंचाईत नको. गळेपडू कुठची! किती झाले तुझे पैसे?'' जयाने मानेनेच नकार दिला. त्या गृहस्थांकडे ती बघत राहिली. त्यांना कुठंतरी तिनं बघितलं होतं.

''पैसे सांग आणि घेऊन जा.'' तेवढ्यात तिला काहीतरी आठवलं.

''पैसे नकोत साहेब. तुमच्याकडून कसले पैसे घ्यायचे? त्यासाठी नाही थांबले. एक आठवण झाली, म्हणून थांबले.

''काय त्रास आहे?''

''साहेब, तुम्ही मला ओळखलं नाहीत; पण तुमच्यासारख्या देवमाणसाला मी कसं विसरणार? सहा वर्षांपूर्वी दोरीवरून चालताना पडलेली डोंबाऱ्याची मी पोर. जया माझं नावं. तुम्ही ताबडतोब डॉ टरांकडे नेलं. उपचार करून झाल्यावर पैसे देऊन तुम्ही निघून गेलात. आपणहून मदत केलीत. माणुसकीचं खरं दर्शन झालं. लहान होते मी तेव्हा. आज, इत या वर्षांनी तुम्ही भेटलात साहेब. तुमच्याकडून पैसे घेऊ मी?''

''अच्छा, अच्छा! आत्ता आठवलं; ती मुलगी का तू?.''

''होय साहेब''

''पण तू नेमकी या घरी कशी आलीस? मी तर तुला 'पणत्या नकोयत. पुढे जा.' म्हटलं होतं.''

साहेब तुमचे त्यावेळचे शब्द माझ्या कानात होते. आवाजाची ओळख जिवानं आपसूकच जपून ठेवली बघा. वेळेचा, पैशाचा कसला हिशोब तेव्हा तुम्ही केला नाही. साहेब तुम्हाला कसं विसरणार मी?'' जया विचारत होती. तिच्या डोळ्यांना पाण्याच्या धारा लागल्या होत्या. त्या गृहस्थांच्या डोळ्यांतही पाणी तरारलं. कंठ दाटून आला. शब्द फुटेना. दोन पावलं मागे सरकून त्यांनी जयाला घरात येण्यासाठी हातानेच खूण कली.

– **कविता मेहेंदळे**
६९२/, 'सुखदा' सोसायटी
पुणे-सातारा रस्ता, पुणे - ३७

असाही असतो एक शेवट, जिथून होते सुरुवात पुन्हा। मनातला काळोख उजळ करीत, लुकलुकतात साऱ्या खुणा।।

भेट द्या : माऊंट अबू वाइल्डलाइफ सॅन च्युरी – राजस्थान, क्षेत्रफळ २८८ चौ. किमी., वाघ, सिंहासाठी प्रसिद्ध
प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके

समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!

कुमारांसाठी संग्राह्य पुस्तके

✻ कथासंग्रह	
मृद्‌गंध, मोहोर (प्रत्येकी)	६०/-
बहर	५०/-
कहाणी दोन भावांची	३०/-
मृदुभाव जागे होता...	३०/-
प्रेरक कथा	४०/-
✻ ललित लेखसंग्रह	
अलगुज	५०/-
केवड्याचं पान	५०/-
बकुळफुल	६०/-
✻ काव्य रसग्रहण	
गंध मोहवी काव्याचा – भाग १ व २ प्रत्येकी	७०/-
✻ माहितीपर पुस्तके	
गिर्यारोहणगाथा	४०/-
छंद आकाशदर्शनाचा	८०/-
आपला पाऊस	३०/-
✻ कविता संग्रह / काव्यप ती	
अक्षरबोली	३०/-
कवितेच्या गावा	३०/-
शब्दांची रत्ने	६०-
✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह	
स्वीकारशील स्वदेशी	५०/-
हट्टी व्हा, हट्टी !	५०/-
हरित संदेश	१५/-
Green Messages	२०/-
✻ व्य तिविकासाशी निगडित पुस्तके	
प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास	५०/-
व्य तिविकासासाठी विद्याव्रत	७०/-
कल्पक बनू या	८०/-
गीता-गीताई	१०/-
Be Creative	१५०/-
तरंग मनाचे	५०/-
✻ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके	
आयुष्यातील वादळलाटा	७०/-
कथा इस्रोची	६०/-
आम्ही असे घडलो	८०/-
जिद्दीची लोभस रूपं	६०/-
हरिसिंह नलुआ	६०/-
✻ अभ्यासविषयक/कृतिपर पुस्तक	
त्रिमितीची किमया	७५/-
असे घटते सुंदर अक्षर	१५/-
प्रज्ञाबोध – भाग ४	६०/-
प्रज्ञाबोध – भाग ५	७०/-

ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक व वैचारिक पुस्तके

✻ विवेकानंदांचा राष्ट्रधर्म	६०/-
✻ विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता	८०/-
✻ राष्ट्रद्रष्टे विवेकानंद	१२०/-
✻ समर्थ रामदास काय म्हणाले?	६०/-
✻ राष्ट्रदेवो भव	५०/-
✻ स्मृतीतुनी स्फुरो कृती	१५/-
✻ महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म	३०/-
✻ ज्ञानप्रबोधिनीचे संस्थापक वि.वि. पेंडसे	१००/-
✻ महर्षी दयानंद काय म्हणाले?	३०/-
✻ स्वत:ला घडविण्यासाठी उपासना	३०/-

छात्र प्रबोधन DVD (PDF स्वरुपात)

१४४ अंक/७५०० पाने : फ त १५० रुपयांत

पालक-शिक्षकांसाठी उपयु त पुस्तके

✻ हसत खेळत बुद्धिविकास भाग- १ व २ (प्रत्येकी)	१५०/-
✻ गंमत मोठ्ठं होण्यातली	१५०/-
✻ मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड १ व २ (प्रत्येकी)	२५०/-
✻ राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण	१००/-
✻ आश्वासक पालकत्व	८०/-
✻ सामाजिक जाणीव संवर्धन	८०/-
✻ रूप पालटू शिक्षणाचे	३०/-
✻ बुद्धिवैभव	२५/-
✻ Glory of Intelligence	३०/-
✻ Enhancement of Intelligence through play I & II (Each)	१५०/-
✻ प्रबोधन गीते	२०/-
MP3 Audio CD	५०/-

✻ ज्ञानप्रबोधिनी खंड - ४

भाग-१ शिक्षण प्रभाग	१००	भाग-३ ग्रामविकसन प्रभाग	१००
भाग-२ संशोधन प्रभाग	१००	चित्ररुप ज्ञान प्रबोधिनी	७५

ओळखा पाहू...

गाणे गातो पण गायक नाही
फुले फुलवितो पण माळी नाही
अवखळ आहे पण आवडीचा
पुढे पुढे जाणे हा धर्म त्याचा

ते आहेत सात
पण दिसेनात,
ते आहेत सात
पण दिसतात.

ओळखा पाहू – पान क्र. ३२ – ऋतू, प्रेशर कुकर
– पान क्र. २७ – झरा, सूर, रंग

पा. क्र. १० बौद्धीक खुराक – उत्तरे

```
  178
+ 534
  269
-----
  981
```

चेकलिस्ट स्लीप –
आणि एका वस्तूची किंमत इतर दोहोंपेक्षा
कोणत्याही एकाच्या तिप्पट आहे.
म्हणून : 178 X 3

कोणते अधिक लांबीचे ?
दोन्ही भाग सारख्याच लांबीचे आहेत. आडव्या पट्टीची जेवढी लांबी आहे, तेवढीच लांबी उभट पट्टीची आहे; परंतु उभट पट्टी जास्त लांबीची वाटते. आडवी पट्टी लहान दिसते, कारण ती दोन भागांत विभागली आहे.

निर्मल, निर्भर वातावरणी, धुके तरंगे धूसर धूसर। झगमगते जणू नक्षी त्यावर, सोनेरी किरणांची सुंदर ।।

भेट द्या – सत्यमंगलम अभयारण्य – तामिळनाडू, क्षेत्रफळ १४११. ६ चौ. किमी., भारतीय हत्तींसाठी प्रसिद्ध

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

‘यलो’ - एक सकारात्मक संघर्ष

– चारुता परांजपे

चित्रपट रसास्वाद

गेल्या २-३ वर्षांमध्ये कुमारवयीन मुलांचे भावविश्व मांडणारे अनेक चित्रपट येऊन गेले. यामध्ये निम्न आर्थिक स्तरातील, शारीरिक दृष्ट्या विकलांग, सामाजिकदृष्ट्या वंचित अशा मुलांचे अनुभव, त्यांचे भावविश्व, त्यांचे प्रश्न मांडले गेले. उदा. टिंग्या, ताऱ्यांचे बेट, बालक-पालक, फॅन्ड्री, धग इ. या सर्व चित्रपटांनी प्रेक्षकांना एक वेगळा, नवा दृष्टिकोन दिला. ‘यलो’ चित्रपटही याला अपवाद नाही. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे *Down Syndrome** असणाऱ्या वास्तवातील गौरीची ही कथा. प्रथमच दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पाऊल टाकलेल्या पण छायाचित्रकार म्हणून चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध असलेल्या महेश लिमये यांचा ‘यलो’ हा चित्रपट म्हणजे गौरीच्या खऱ्याखुऱ्या कर्तृत्वाची कहाणी आहे !

कथा सुरू होते ती गौरीच्या खेळण्याने, हसण्याने, तिच्या स्क्रॅपबुक मधील तिची आई, मामा यांच्या वर्णनाने ! मुग्धा व शेखर गाडगीळ यांची गौरी ही मुलगी. ती ‘स्पेशल चाईल्ड’ असते. मुग्धाला मात्र इतर सामान्य मुलांप्रमाणे गौरीला वाढवायचे असते. सामान्य मुलांप्रमाणे ती पुढे जाऊ शकत नाही हे कळल्यावर गौरीचे आईवडील – मुग्धा व शेखर हतबल होतात. गौरीची आई मात्र आपल्या मुलीसाठी-गौरीसाठी खूप प्रयत्न करत असते. तिचे वडील मात्र यासंदर्भात तटस्थ असतात. एवढंच नाही तर स्वत:च्याच मुलीबद्दल वाटणारा राग, तिरस्कार शेखरच्या वागण्यातून वारंवार जाणवतो. यामुळे गौरीच्या आई-वडिलांच्या नात्यात भावनिक ताणतणाव निर्माण होतात. एकदा बाहेरगावी फिरायला गेले असताना खेळता खेळता गौरी तलावात पडते. तिला वाचवण्याचा प्रयत्नही तो करत नाही. शेवटी मुग्धा एका अनोळखी माणसाच्या साहाय्याने गौरीला वाचवते. या सर्वाचा मनस्ताप होऊन मुग्धा शेखरपासून वेगळी राहू लागते. गौरीचा मामा ‘श्री’ कडे त्या दोघी राहायला येतात.

(स्पेशल चाईल्ड असल्यामुळे) आत्ममग्न व लाजाळू असणाऱ्या गौरीला मात्र आपल्या आजूबाजूला काय घडतंय याचं आकलन होत नसतं. ती स्वत:च्या विश्वात रममाण असते. हसणं, खेळणं एवढंच काय ते तिला माहीत असतं. मामाची व गौरीची गट्टी पहिल्यापासून असते. शेजाऱ्यांची फजिती करणं, विनोद सांगणं, हसणं, खिदळणं, गोष्टी सांगणं, खेळणं असे मामाचे व गौरीचे दिवस अगदी मजेत जात असतात. हे सर्व होत असताना मुग्धाला मात्र गौरीच्या भविष्याची काळजी वाटत असते. गौरीबद्दल अतिशय हळव्या असणाऱ्या मुग्धाला ‘आपल्या गौरीला समाजात सन्मानाची वागणूक मिळेल का?’ हा प्रश्न सतत भेडसावत असतो. अशा विशेष मुलांसाठी असलेल्या एका *Special* शाळेविषयी मुग्धाला कळते व गौरी त्या शाळेत जाऊ लागते. गौरी या मुलांच्यात छान मिसळून जाते. गौरीच्यासंदर्भात घडलेल्या १-२ प्रसंगांमधून तिच्या मामाला गौरीचे पाण्याबद्दल असलेले आकर्षण लक्षात येते. गौरीच्या शाळेच्या मुख्याध्यापिका व मामाच्या पाठिंब्यामुळे मुग्धा गौरीला पोहण्याच्या प्रशिक्षण वर्गात पाठवते. गौरीला पाणी मुळातच आवडत असते व आता पद्धतशीर सरावामुळे गौरी छान पोहायला लागते. गौरीची प्रगती पाहून तिची निवड स्पर्धांच्या विशेष प्रशिक्षणासाठी होते. यासाठी गौरीला ‘प्रताप सरदेशमुख’ यांच्याकडे मुग्धा पाठवायला सुरुवात करते.

मुळात अतिशय शिस्तप्रिय, कडक असलेल्या प्रताप सरांच्यात व गौरीमध्ये हळूहळू एक नातं निर्माण होतं. स्पर्धेसाठी प्रशिक्षण असल्याने गौरीलाही नेहमीपेक्षा खूप जास्त कष्ट घ्यावे लागत असतात. या अति ताणामुळे गौरीच्या शारीरिक तक्रारी सुरू होतात. गौरीला ताप येऊ

डोंगराच्या मायेसाठी, रूप वाफेचे घेऊन। नदी तरंगत जाते, पंख वाऱ्याचे लावून।।

भेट द्या – चंद्रप्रभा अभयारण्य – उत्तरप्रदेश, इ. स. १९५७, क्षेत्रफळ ७४ चौ. किमी., आशियाई सिंहासाठी प्रसिद्ध

सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

लागतो. मुग्धाला एका क्षणी वाटायला लागतं ‘कशासाठी हा त्रास? प्रतिष्ठा, सन्मान मिळावा म्हणून?’, गौरीची होत असलेली शारीरिक ओढाताण पाहून आईचं हृदय कळवळतं. मुग्धा गौरीचं पोहणं बंद करते. परंतु प्रताप सरांनी गौरीमधील गुण पारखलेले असतात. ते गौरीच्या आईशी बोलायला जातात. गौरीच्या आईचं मन वळवण्यात प्रताप सर यशस्वी होतात. याच प्रताप सरांच्या, व मामाच्या पाठिंब्यामुळे गौरी पुन्हा एकदा पोहायला लागते व राष्ट्रीय कीर्तीची जलतरणपटू होते. इतरांप्रमाणे *ordinary* नसणाऱ्या गौरीचा *Extraordinary* होण्याचा हा हृदयस्पर्शी पण वास्तववादी प्रवास ‘यलो’मधून आपल्यासमोर मांडला आहे.

या चित्रपटाचे नाव ‘यलो’ का? असा प्रश्न आपल्याला सतत पडत असतो. त्याचे उत्तर चित्रपटाच्या शेवटच्या प्रसंगात मिळते. फिश टँक मधील एका माश्याला गौरीने दिलेले नाव ‘यलो’. चित्रपटातील शेवटच्या स्पर्धेआधी प्रतापसर गौरीला सांगतात ‘आज तू यलो आहेस, तुला यलो बनूनच आज पाण्यात उतरायचे आहे’ असे म्हणून ते गौरीला यलो रंगाचा चष्मा भेट देतात. गौरी तो चष्मा घालून यलो प्रमाणे पाण्यात उत्तम पोहते व ही स्पर्धा जिंकते. यावेळी गौरीचे ‘यलो’ मधे झालेले रूपांतर पाहून या चित्रपटाचे शीर्षक किती समर्पक आहे याची प्रचीती येते.

मुग्धा व शेखर गाडगीळ यांच्या व्यि तरेखा अनुक्रमे मृणाल कुलकर्णी व मनोज जोशी यांनी उत्कृष्ट साकारल्या आहेत. मनोज जोशीने गौरीबद्दलचा तिरस्कार अतिशय प्रभावी अभिनयातून व्य त केला आहे. मृणाल कुलकर्णी (मुग्धा) व ऋषिकेश जोशी (गौरीचा मामा) या दोघांनीही आपापल्या व्यि तरेखांना पुरेपुर न्याय दिला आहे. आई-मुलगी या नात्यातील हळुवारपणा, मुलीबद्दलची स्वाभाविक काळजी, गौरीला समाजात स्थान मिळावे म्हणून तिच्या मनाची झालेली तगमग, गौरीला वाढवताना आलेले चढउतार मृणाल कुलकर्णीने अतिशय उत्कटपणे साकारले आहेत. ‘श्री’ ही व्यि तरेखा ऋषिकेश जोशींनी अप्रतिम साकारली आहे. गौरीबरोबरची मस्ती, हसणं, खेळणं, गौरीला वेळोवेळी दिलेला पाठिंबा, मुग्धाला दिलेले मनोबल व आर्थिक सा हाय्य या सर्वामुळे व सरळ, स्वाभाविक अभिनयामुळे श्री विशेष लक्षात राहतो. तसेच प्रिन्स ची आजी ही छोटी पण अगदी ठळकपणे लक्षात राहणारी भूमिका उषा नाडकर्णी यांनी साकारली आहे. गौरीचे प्रशिक्षक प्रताप सर यांची भूमिका उपेंद्र लिमयेंनी जीव ओतून साकारली आहे. प्रतापसरांची शिस्तप्रियता तर अनेक प्रसंगातून दिसतेच; पण गौरीला शिकवायला लागल्यानंतर त्यांच्यातील विलक्षण बदल, वागण्यातील मार्दव उत्तरार्धातील दृश्यांमधून दिसून येते. गौरीला *Butterfly Storke* शिकवताना सांगितलेली गोष्ट, त्यातले हावभाव असोत किंवा आजारी गौरीला प्रोत्साहन देऊन पोहायला परत घेऊन येण्यासाठी केलेली धडपड असो; या सर्वातून व्य त होणारी एका प्रशिक्षकाची मानसिकता, आपल्या विद्यार्थ्यांबद्दलचा विश्वास याचे दर्शन त्यांच्या अभिनयातून दिसून येते.

ही गोष्ट गौरीची आहे. त्यामुळे प्रत्यक्ष गौरी गाडगीळलाच या चित्रपटात घेतल्यामुळे या चित्रपटाने एक नवा इतिहास घडविला आहे. गौरीने चित्रपटात उत्कृष्ट अभिनय केला आहे. आत्ममग्न व लाजाळू असणाऱ्या गौरीचा आत्मविश्वास, तिचे वर्गातील मुलांसमोरचे भाषण, प्रताप सरांची न कल या सर्व गोष्टी अभिनयातून आपल्या मनावर ठसवण्यात गौरी यशस्वी होते.

चित्रपटातील साधे-सरळ हृदयस्पर्शी संवाद, सोपी, सुटसुटीत मांडणी यामुळे ही कथा वास्तववादी व कोणताही कृत्रिम आविर्भाव न दाखवत आपल्यासमोर सादर होते. संगीत दिग्दर्शक कौशल इनामदार व गीतकार गुरू ठाकूर

प्रीतीच्या छायेत नांदती, जेथे निर्मळ नाती। ते केवळ घर आणिक दुसरे, आकाश अन् माती।।

भेट द्या - गोविंदप्रभू विहार अभयारण्य - उत्तराखंड, क्षेत्रफळ ९५७ चौ. किमी., चित्त्याच्या प्रकल्पासाठी प्रसिद्ध

७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

या द्वयीमुळे 'यलो' अधिक गहिरा झाला आहे. स्वत: छायाचित्रकार असलेल्या महेश लिमये यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केल्याने चित्रपटातील पाण्याखालचे चित्रण लाजवाब झाले आहे. एकूणच कोणताही उपदेश न करता अशा *Special* मुलांकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन नकळत दिग्दर्शकाने आपल्याला दिला आहे. सर्व गोष्टी उपलब्ध असून, शारीरिक मानसिकरित्या तंदुरुस्त असूनही आपण आपल्या क्षमतांचा योग्य वापर करत नाही. ह्याची खंत हा चित्रपट पाहताना न कीच जाणवेल. हा चित्रपट प्रेक्षकांना सकारात्मक ऊर्जा देतो. अशी या गौरीच्या जिद्दीची, आत्मविश्वासाची ही सर्वांगसुंदर कहाणी.

विशेष म्हणजे नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये 'यलो' चित्रपटाला लक्षणीय चित्रपट व गौरी गाडगीळला ज्युरींकडून विशेष पुरस्काराने सन्मानित केले गेले. या सुट्टीत 'यलो' जरूर पाहा !!

❖ ❖ ❖

– चारुता परांजपे
एम–८/३५०, लक्ष्मीनगर,
पर्वती, पुणे – ९

(* गुणसूत्राच्या जोडीमधे असलेल्या दोषामुळे निर्माण होणारी बौद्धीक व शारीरिक कमतरता म्हणजे *Down Syndrome.*)

अनुभवसंपन्न आणि अर्थपूर्ण सुट्टीसाठी... व्य तिकार्ये – भाग २ (५ वी ते ८ वीच्या मुला–मुलींसाठी)

मित्रांनो, ही सुट्टी अधिक अनुभवसंपन्न व अर्थपूर्ण करण्यासाठी सुट्टीत तुम्ही एकूण २० कामे पूर्ण करायची आहेत. मागील अंकात (सौर चैत्र/एप्रिल २०१४) त्यापैकी दहा कामे दिली होती. त्यातील काही कामे तुम्ही आत्तापर्यंत पूर्ण केलीही असतील. काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून त्यापुढे ते नोंदवून ठेवा. काम करताना आलेली मजा, झालेली फजिती, मिळालेला नवीन अनुभव इ. गोष्टीही थोड यात लिहा. श य झाल्यास आपल्या आई-बाबांची त्यापुढे स्वाक्षरी घ्या. आता पुढील १० कामे या अंकात देत आहोत. ती पूर्ण करा आणि घरच्यांच्या शाबासकीबरोबर छात्र प्रबोधनतर्फे बक्षीसही मिळवा.

व्य तिकार्ये

११. जवळच्या भाजीच्या दुकानात जाऊन दहा पालेभाज्यांची माहिती करून घ्या व कोणतीही एक पालेभाजी आणून त्याची भाजी तयार करा. (निवडण्यापासून शिजवण्यापर्यंत सर्व कृती तुम्हीच करायची आहे.)
१२. बँकेत स्वत:च्या किंवा आई-बाबांच्या खात्यात काही र कम जमा करा व काही र कम काढून आणा.
१३. तुमच्या घरात कचऱ्यात टाकून दिल्या जाणाऱ्या ५० वस्तूंची यादी करा. त्यांचे ५-७ गटात वर्गीकरण करा आणि त्यातल्या एका वस्तूचा कशा रितीने पुन्हा वापर करता येईल याबद्दल दहा कल्पना लिहा.
१४. स्वत:चा एक ड्रेस धुवून त्याला इस्त्री करा.
१५. घरी आलेले वीज बिल दरपत्रकाप्रमाणे तपासून, ते भरून या. तसेच घरातील विजेवर चालणाऱ्या यंत्रांची एक यादी करा. प्रत्येक यंत्र एका तासाला किती वीज वापरते याची मिळवा. एका दिवसात विविध यंत्रे (दिवे, पंखे, फ्री) किती तास चालू होती याच्या नोंदी ठेवून एकूण किती युनीट वीज वापरली गेली ते काढा. तुमच्या वीज मीटरच्या रिडींगशी ते तपासून पहा.
१६. घरात असलेल्या पुस्तकांची (पाठ्यपुस्तके/अभ्यासाव्यतिरि त) यादी तयार करा व त्यातल्या एखाद्यातरी जुन्या पुस्तकाची बांधणी करा.
१७. छात्र प्रबोधनच्या कोणत्याही एका अंकातील कवितेला चाल लावून ती कविता पाठ करा व घरातल्यांसमोर सादर करा.
१८. घरातील मोठ्या चादरी, पडदे धुवा आणि वाळत टाका.
१९. घरातील आजी/आजोबा किंवा वृद्ध व्य तीचे चरित्र लिहा. (वहीची ८-१० पाने)
२०. कुल्फी/आइस्क्रीम स्वत: घरी बनवा व भावंडांबरोबर तुम्हीसुद्धा खा.

स्वार्थाच्या बीजास फुटावा, अंकुर नि:स्वार्थाचा। प्रपंचा घरी कधी पाहुणा, यावा परमार्थाचा।।

भेट द्या – केदारनाथ अभयारण्य – उत्तराखंड, क्षेत्रफळ ९७५ चौ. किमी., हिमालयन अस्वल व हिमालयीन प्राणी व पक्ष्यांसाठी

NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

छंद पक्षिनिरीक्षणाचा...

– मेधा जोगदेव

पक्षी म्हणजे स्वर्गातून उतरलेले देवाचे भाटच जणू. मु त कंठाने, स्वच्छंद बागडत ते सुरेल गाणी गात असतात. पक्षी निरीक्षणाचा छंद जडण्याअगोदरही मला नाद लागला तो पक्ष्यांची गाणी ऐकण्याचा. मंजूळ, मधुर आवाजात विविध सुरावटी ऐकताना जो आनंद मिळतो तो शब्दात सांगताच येणार नाही. पक्ष्यांची गाणी ऐकण्यासाठी कान तयार व्हावा लागतो. लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही गच्चीत झोपत असू. उन्हाळ्यात उजाडते लवकर; त्यामुळे पहाटे पहाटे जाग यायची ती एका पक्ष्याच्या मंजूळ किलबिलाटाने. एकामागून एक सुरेल लकेरी घेत तो झाडांवर बागडत असायचा. नंतर तो दयाळ होता हे समजले. चिमण्या, कावळे, कोकिळा, बुलबुल, भारद्वाज, कबूतर, पारवा, टिटवी यांचे आवाज कानावर पडून पडून ओळखू येऊ लागले. पण मग हळूहळू खंड्याचा चीत्कार करत जाणारा चढा आवाज, घारीचे किंचाळत ओरडणे, तुईया पोपटाचा वैशिष्ट्यपूर्ण आवाज हे सर्व आवाज परिचित होऊ लागले. शिंपी, वटवटे, शिंजीर हे जेमतेम छोट्या तळहाताएवढे असणारे पक्षी चांगल्या दमदार आवाजात ओरडतात हे ऐकून खरंच थ क झाले. सुभगाची हळुवार शीळ, हळद्याची खट्याळ वाणी, नाचण पक्ष्याची संमिश्र धून, ब्राह्मणी मैनांचे युगुलगीत, साळुं यांचा रागीट कलकलाट, कोतवालाचे इशारा करत ओरडणे, टकाचोराचा जंगल भारून टाकणारा आवाज हे सारे अनुभव स्वर्गीय वाटू लागले. या आवाजांचा मागोवा घेता घेता पक्षिनिरीक्षणाचा छंद कधी जडला ते समजलेच नाही.

मग पक्षितज्ज्ञांची व्याख्याने ऐकणे, स्लाईड शो बघणे यामुळे या छंदाला खतपाणी मिळाले. समविचारी मित्रमैत्रिणींची ओळख झाली. पक्षी निरीक्षण करता येतील अशी पुण्याजवळची ठिकाणे कळली. तसेच आमच्या घराजवळच असेलेल्या तळजाई परिसरात पक्षिनिरीक्षणासाठी फिरू लागले. व्यायामासाठी कधी कधी तेथे मी पायी फिरायला जात होतेच. पण आता त्याला पक्षिनिरीक्षणाची जोड मिळाली. कान आणि नजर आपसूक तीक्ष्ण होऊ लागले.

मला वाटायला लागलं 'नित्य नवा दिवस जागृतीचा' या ओवीप्रमाणे पक्षिनिरीक्षण म्हणजे 'नित्य नवा दिवस अनुभवाचा' या निमित्ताने मी निसर्गाच्या अधिक जवळ गेले. निसर्गातील बदल टिपू लागले. निरनिराळे वृक्ष त्यांची फुले, सुवास, ऋतुमानानुसार निरनिराळा साज परिधान करणारा

आज पडे हे पाऊल पहिले, यशोपथावरती। वाट चालणे जलद गतीने, सातत्याने पुढती॥

भेट द्या : महानंदा अभयारण्य – प. बंगाल, क्षेत्रफळ १५९ चौ. किमी., रॉयल बंगाली वाघ, गव्यांसाठी प्रसिद्ध

मार्च-एप्रिल-मेमध्ये - बारावीसाठी निवासी नेतृत्व शिबिरे - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४

परिसर विलोभनीय वाटू लागला. एखादे निष्पर्ण झाड देखील निसर्गातील कलाकृतीच भासू लागली. झाडाचे खोड, फांद्यांची रचना, पानाचा आकार, फुलाचा रंग, सुवास, झाड देशी आहे का विदेशी याबद्दल उत्सुकता वाटू लागली. व्यायामासाठी चालताना घड्याळ आणि अंतर यावर नजर असायची; पण पक्षी बघताना मात्र दोहोंचेही भान राहात नसे. व्यायाम तर व्हायचाच. पण मनावरचा ताण हलका होत असे. मन एका धुंदीत असल्या कारणाने पूर्ण एकाग्रतेने, मनात दुसरे कुठलेच विचार न येता केवळ निसर्गाच्या सान्निध्यात आनंद मिळवू लागले. गदिमांच्या

'बिनभिंतीची उघडी शाळा
निसर्ग इथला गुरू'

या कवितेचा प्रत्यय येऊ लागला. थोड्या वेळेपुरते मौनव्रत आचरले गेले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संयम वाढीस लागला.

मनाची पाटी कोरी ठेऊन, मनात कुठलेच पूर्वग्रह न ठेवता मी बाहेर पडते. मनात कुठलीच गणिते मांडत नाही, आडाखे बांधत नाही. डोळे आणि कान यांच्यात प्राण आणून चालतच राहाते. कधी कानी पडतो सुभग पक्ष्याचा गायनाचा रियाझ, तर कधी दिसते हळद्याची सोनेरी भरारी. कधी नीलपंख आपले पंख सावरत पाठीवर ऊन घेत असतो. कधी एखाद्या मंजूळ लकेरीला दूरवरून तसाच प्रतिसाद येतो, तर कधी कोणाची आर्त साद मला मनाला व्याकूळ करते. पंखांचे विविध आकार, शेपट्यांचे नाना प्रकार, चोचींच्या ठेवणी, गायनाच्या लकबी, मोहक रंग, उडण्याच्या नाना तऱ्हा हे बघून या छंदात गुरफटू लागले. देवाघरची ही पाखरे पुन्हा पुन्हा बोलवतात. कधी दिसतात, कधी लपतात. कधी कधी एकेक तास चालून काहीच साध्य होत नाही तर कधी शेवटच्या १० मिनिटात जणू थरार नाट्य घडते. विलोभनीय दृश्ये दिसतात. आधीची रिकामी पायपीट सार्थकी लागते.

सूर्याचा पहिला किरण झाडावर पोहोचताच ही पाखरे जागी होतात. ना आळस, ना कंटाळा, ना कुरकूर. आनंदाने बागडत, मु त कंठाने, मधुर स्वरात ती गाऊ लागतात; जणू ते विधात्याची प्रार्थना करत असतात. नाना संकटांशी सामना करत हे चिमुकले जीव स्वत: आनंद घेतात आणि दुसऱ्यालाही देतात. आलेला दिवस उत्कटतेने जगतात; म्हणूनच दिवसेंदिवस त्यांना निरखायची इच्छा उत्कट होत जात आहे.

सौ. मेधा जोगदेव
४१/२, प्रतिभा सोसायटी
शाहू कॉलेज रस्ता, शिवदर्शन चौक,
पुणे- 411 009

ओळखा पाहू...

तीन भाऊ तीन तऱ्हेचे
एक गरम, त्रास देतो फार
दुसरा बरसे अमृतधार
तिसरा कधी करी बेजार
कोण बरे ओळखणार?

पंधरा मिनिटात करतो कमाल
तीन मजल्यातील
शिजवितो माल
आहे तो फार कामाचा
न कीच तुमच्या ओळखीचा

‘थ’ थव्याचा !

– अरविंद भावे

अ...अननसाचा, क – कमळाचा... चकचकीत कागदावरील रंगीत चित्रं आणि अक्षरं असलेल्या बाराखडीच्या तक्त्याने आपल्या अभ्यासाचा श्रीगणेशा झालेला असतो. आठवतो तो तक्ता?

त्यातील ‘थ – थव्याचा’ थोडासा वेगळा – म्हणजे एका वस्तूचं चित्र नसलेला...माणसांच्या समूहाचं चित्र असलेला...वाढत्या वयाबरोबर लेखकाला या थव्यात आपल्या देशातील समाजाचे रूप दिसते...मग त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन...समाजाचे वर्तन...थव्याचे – झुंडीत होणारे रूपांतर आणि अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे बरेच काही!

मला आठवते, माझ्या लहानपणी विशेषत: लहान बालगोपाल मंडळी असलेल्या प्रत्येक घरी, अक्षर ओळख होण्यासाठी बाराखडीचा एक त ता लावलेला असे. त्याकाळी असा हा त ता अधिक उजेड असलेल्या खोलीत म्हणजे दिवाणखान्यात असे. कारण तुलनात्मक दृष्टीने माजघर आदी इतर खोल्यांतून उजेड कमी असायचा.

या त त्यातील प्रामुख्याने लक्ष वेधणारी काही अक्षरे अजून माझ्या स्मरणात आहेत. जसे अननसाचा ‘अ’! त्या चित्रांतील अननसाचे आम्हा मुलांना फार आकर्षण असे. कारण आमच्या त्या शहरवजा खेड्याच्या बाजारात अथवा अन्यत्र गावात कुठेही आम्ही कधी खरा अननस बघितला नव्हता. आणि त्याकाळी अननसाचे तुकडे किंवा पेय असे डबेबंद जिन्नसही मिळत नसत. त्यामुळे खऱ्या पाईनॲपल/ अननसाची चव आम्हाला माहिती नव्हती !

एकदा मुंबईहून काही पाहुणे आपल्या मुलांसह घरी आलेले असताना त्यांनी मातीची खेळणी आणली होती. त्यात मात्र मातीचा रंगीत अननस होता. पण त्यावरील बोथट काटे बघून आम्हाला तो फणसासारखा वाटला होता !

दुसरे अक्षर होते ऋ ! लहानपणी ते अक्षर गिरवल्यानंतर आजपर्यंत मी त्या अक्षराचा वापर फारच कमी केलेला आहे. कारण आजच्या

झाडे असतात प्रामाणिक, करीत नाहीत वि ासघात। जे हात घाव घालतात, त्यांच्याही चुली पेटवतात।।

भेट द्या : नवेगाव राष्ट्रीय उद्यान – महाराष्ट्र, क्षेत्रफळ १३३.८८ चौ. किमी., पक्षी निरीक्षण तसेच जंगल सफारीसाठी प्रसिद्ध

कालोचित, अर्थपूर्ण संस्कारांसाठी - पौरोहित्य विभाग, संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४७

काळात ऋषी हा शब्द विशेष करून पौराणिक कथेतूनच आढळतो. त्या त त्यामध्ये ऋषीचा ऋ दाखविताना पारंब्या असलेले एक वडाचे झाड आणि त्या वृक्षाखाली ध्यानस्थ बसलेले एक 'ऋषी' असे ते चित्र असे. मला ते ऋषी फार आदरणीय वाटत असत. त्यामुळे 'ऋ' हे अक्षर मी तन्मयतेने गिरवत असे. पण त्या 'ऋ'चा कमी प्रमाणात वापर झाला याची अजूनही माझ्या मनात खंत आहे.

तिसरे लक्षात राहण्यासारखे अक्षर म्हणजे झबल्याचा 'झ' आखूड बाह्या असलेले एक रंगीत झबले हे चित्र त्याकरीता योग्य होते. आजकालच्या आधुनिक बाराखडीच्या त त्यात बाह्या नसलेले (स्लीव्हलेस) झबले दाखविणे कदाचित जास्त उचित ठरेल!

या सर्वांमध्ये गमतीदार आणि उत्सुकता जागृत करणारे अक्षर म्हणजे 'थ'– थव्याचा ! या चित्रात आठ–दहा माणसे एकमेकांना अगदी चिकटून उभी असल्याचे दाखविलेले असायचे. त्याला 'थवा' म्हणायचे. त्या चित्रांत हॅट घातलेला मुसलमान, उंच खडी काळी टोपी आणि अंगरखा म्हणून लांब शेरवानी घातलेला पारसी, पगडी घातलेला आणि दाढीमिशा असलेला सरदारजी, पुणेरी पगडी असलेला एक हिंदू आणि पांढरा फेटा बांधलेला तसेच कपाळाला टिळा असलेला वारकरीदेखील होता. असे सर्वधर्मसमभाव दर्शविणारे ते चित्र असायचे. विशेष म्हणजे त्या सर्वांच्या डो यावरती त्यांना सामावणारी एक सामुदायिक छत्री असे. त्या छत्रीखाली सामावण्याकरीता कदाचित ते सारे इतके चिकटून–चिकटून उभे असलेले त्या चित्रात दाखवीत असत. पण असा तो थव्याचा 'थ' माझ्या लक्षात कायमचा राहिला आहे आणि या थव्याची उत्सुकता देखील तशीच कायम आहे.

गंमत म्हणजे 'थवा' हा शब्द आपल्या दैनंदिन व्यवहारात आणि चर्चेत देखील वचितच वापरला जातो. नाही म्हणायला, पाणथळ्यावर किंवा सायंकाळी परतणाऱ्या अथवा आकाशात भरारी मारणाऱ्या त्या असंख्य बगळ्यांना 'थवा' म्हणून हमखास संबोधितात हेही तितकेच खरे आहे.

पण माणसे एकत्रित झाल्यावर त्यांना 'थवा' असे मात्र कधी म्हणत नाहीत. कदाचित 'थवा' हा शब्द अधिक साहित्यिक असावा. म्हणून आम जनतेच्या अखत्यारीत 'थवा' हा शब्द नसावा.

पण त्या थव्यातील माणसे भावनाविवश होऊन अगर स्वखुषीने नव्हे तर कुठल्यातरी धाकदडपशाहीमुळे किंवा नाईलाजाने एकमेकांसोबतची जवळीक साधत असावीत, असा

करा करा रे वाचन, त्याने मिळेल तुम्हा वाव। ज्ञानप्राप्तीसाठी खास, हवी वाचनाची हाव।।

भेट द्या : मेळघाट अभयारण्य – महाराष्ट्र, क्षेत्रफळ ५९७.२३ चौ. किमी., वाघांसाठी संरक्षित

वाचनाच्या आनंदाने उजळे अपुले जीवन, **'छात्र प्रबोधन'** सततच देई उपयु त विचारधन.

भास ते चित्र पाहून मला होत असे. आणि ते चित्र बघून, त्या सर्वांची मला त्यावेळी कीव येत असे.

आश्चर्य म्हणजे आज पन्नास-साठवर्षांनंतर देखील तीच परिस्थिती आहे. कारण सर्वधर्मसमभाव या उच्च ध्येयाची वल्गना करून राजकारणी नेते दुजाभाव आणि लांगूल चालन करण्यात मग्न असतात. आणि आपापसातील मत्सर, हेवेदावे याचे समर्थन आपल्या कृतीने करताना आढळतात. त्यामुळे त्यांना आपला स्वत:चा स्वार्थ साधता येतो.

त्या थव्यातील सर्वांनी स्वखुषीने कधीही एकत्रित येऊ नये असेच जणू सर्व राजकारण्यांना वाटत असते. कारण स्वखुषीने ते सारे संघटित झाल्यास राजकारणी नेत्यांना ते घातक होईल, याचे त्यांना सतत भय असते. त्यामुळे कुठल्याही तऱ्हेचे संघटन तोडण्यास ते तत्पर असतात. मात्र मतांसाठी अल्पसंख्यांकांना खूष ठेवण्याचे धोरण सर्वचजण अवलंबतात.

पण अशा भेदभावाचे आचरण सदैव राखून, देशाची सर्वांगीण उन्नती कुंठित करून, अजाणतेपणाने देशाच्या बहुसंख्य जनतेचा आपल्याप्रती असलेला विश्वास आपण गमावत आहोत; हे आजच्या राजकारण्यांच्या ध्यानीमनी येत नसावे. अर्थात त्याचे कारण म्हणजे त्यांची स्वार्थी, संकुचित वृत्ती हेच होय.

त्यामुळे आजही बाराखडीच्या त्या त त्यातील 'थव्याचा-थ' दर्शविणारे ते चित्र बघितले की मला वाटते, साठ वर्षांनंतर देखील तीच परिस्थिती आहे; म्हणजे इतकी जवळीक असूनदेखील त्या थव्यातील सर्व लोक एकमेकांपासून पूर्वीसारखेच दुरावलेले आहेत असे वाटते.

आजमितीला नाईलाजास्तव झालेला अशातऱ्हेचा 'थवा' उंच इमारतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या उद्वाहकात (लिफ्टमध्ये) तेवढा आढळतो. कारण उद्वाहकातील ही सारी माणसे एकमेकांशी अजिबात संबंध नसल्यागत लगेच पांगत असतात. पण हीच परिस्थिती आज विविध संप्रदाय असलेल्या भारतीय लोकशाहीची आहे.

बाराखडीच्या त त्यात दाखविलेल्या 'थव्याचा-थ' हा माणसांचा आहे आणि गेल्या साठ-सत्तर वर्षांत आणि अजूनही सर्वधर्मसमभाव कधी साधलेला नाही. ना सरकारला, ना जनतेला.

म्हणून असे वाटते की थव्याचा 'थ' न म्हणता 'थयथयाटाचा-थ' म्हणणे अधिक संयुतिक ठरेल. म्हणजे त्यात माणसे दाखविल्यास हरकत नाही. अन्यथा 'थव्याचा थ' त्या चित्रात पांढऱ्या शुभ्र बगळ्यांचा थवा दाखविल्यास ते अधिक सार्थकी ठरेल.

म्हणजे मानव प्राण्याची त्या थव्यातून कायमची सुटका होईल आणि असा बाराखडीचा त ता अस्तित्वात असल्यास 'थव्याचा थ' करीता बगळे दाखवावेत. तुम्हाला काय वाटतं? थव्यासाठी बगळे दाखवायचे की आहे तेच चित्र खरं करण्यासाठी आपण सर्वांनी जाणीवपूर्वक बदलायला हवे.

– **अरविंद भावे** (सेवानिवृत्त कर्नल)
Flat No.106 Daisy Block,
L & T Serene County
Gachibowli , Hyderabad - 32

थोडी शी गंमत



होई अज्ञानाचा नाश, दरवळे ज्ञानाचा सुवास। घेता वाचनाचा ध्यास, होई मनाचा विकास।।

भेट द्या : ताडोबा अभयारण्य – महाराष्ट्र, क्षेत्रफळ ६२५.४ चौ. किमी., वाघांसाठी संरक्षित

नवी आव्हाने नवी उभारी रुजावी मनी, **'छात्र प्रबोधन'** म्हणजे बाल कुमारांना पर्वणी.

खराखुरा मित्र

माझा हा मित्र मला
नाही कधी रागवत
टिंगल टवाळी करून
नाही कधी चिडवत

वेळेला माझ्या तो
सदा उपयोगी पडतो.
अंतरंगीचे भाव त्याचे
कधीच ना दडवतो.

बहाणा करून तो
कधीच नाही फसवत
माझ्या मनालाही तो
ठेवतो खळखळून हसवत

त्याच्या सुंदर विचाराने
माझे पोषण होते
त्याच्या सहवासात
दिन आनंदात जाते.

असा माझा मित्र
सदासर्वकाळ हसरा
पुस्तकासारखा खराखुरा
मित्र नाही दुसरा.

एकनाथ आव्हाड
ए/२०२, भाग्यवान सोसायटी,
खारदेवनगर, एन्. जी. आचार्य मार्ग,
चेंबूर, मुंबई - ७१

हास्य लहरी

एक माणूस दुकानात गेला व त्याने विचारले, ''हा फ्रिज केवढ्याला आहे.''

दुकानदाराने सांगितले, ''आम्ही मूर्खांना तो विकत नसतो.''

दुसऱ्या दिवशी तोच माणूस त्या दुकानात एकदम सुटाबूटात गेला व परत त्याने किंमत विचारली.

त्याला हेच उत्तर मिळालं.

तिसऱ्या दिवशी वेषांतर करून चिनी माणसाचा पेहराव घालून त्याने विचारले,

''हा फ्रिज केवढ्याला आहे?''

दुकानदार म्हणाला, ''आम्ही मुर्खांना तो विकत नसतो.''

त्यावर आश्चर्याने त्या माणसाने दुकानदाराला विचारले,

''तुम्ही मला रोज बरोबर कसं ओळखता?''

''कारण तो फ्रिज नसून ते वॉशिंग मशिन आहे.'' दुकानदाराने स्पष्टीकरण दिले.

एकदा एक पोपट उडता उडता ट्रकला धडकतो आणि बेशुद्ध होतो. ट्रक ड्रायव्हर पोपटाला घरी आणून पाणी पाजतो आणि पिंजऱ्यात ठेवतो. दोन तासांनी पोपटाला शुद्ध येते आणि स्वत:ला पिंजऱ्यात पाहून पोपट म्हणतो...

अरेच्चा!! मी तुरुंगात? ट्रक ड्रायव्हर मेला की काय?

गोविंदरावांनी आंधळ्याकडे पाहून त्याच्याकडे पैसे फेकले. पण ते त्याच्या वाटीत न पडता घरंगळत जाऊन पलीकडच्या नालीत पडले, तरीही त्या आंधळ्याने ते जाऊन उचलले.

''अरे, पण तू आंधळा असून तुला कसे सापडले ते नाणे?''

''वा रावसाहेब! मी काय नेहमीचा प का आंधळा नाही! तो आज शिनेमा पाहाया गेलाय म्हून तेवढ्यापुरता, आलोय आज! नव्हं का !''

वाचन आहे प्रवास सुंदर, नव्या नव्या ज्ञानाचा। इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा।।

भेट द्या : महात्मा गांधी सागरी राष्ट्रीय उद्यान - अंदमान, क्षेत्रफळ २८१.३ चौ. किमी., सागरी जीवनदर्शन व कोरल्ससाठी

शरीर-मन-बुद्धीचा असावा परस्परांशी संवाद, **'छात्र प्रबोधन'** वाचून द्यावा कृतिरूप प्रतिसाद.

संवाद कौशल्य

लेखांक – ११

‘अर्थपूर्ण’ संवादासाठी

– आश्लेषा महाजन

‘टॅंह टॅंह’करणाऱ्या बाळापासून ते म्हाताऱ्या आजींपर्यंत आणि बडबड करणाऱ्या निवेदकापासून ते हातवारे करणाऱ्या मूकबधीर मुलीपर्यंत... सगळेजण ‘बोलत’ असतात. कारण प्रत्येकाला बोलावंसं वाटतं, आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवावेसे वाटतात, भावना व्य त कराव्याशा वाटतात.

माणूस बोलतो. कारण बोलल्यामुळे गोष्टी स्पष्ट होतात. आपल्या मनातले ओळखायला सगळे काही मनकवडे नसतात. आपण बोलतो कारण आपल्याला आपलं काम करवून घ्यायचं असतं. व्यवहार पार पाडायचा असतो. ज्ञान मिळवायचं असतं. संवाद साधायचा असतो. मन मोकळं करायचं असतं. संवाद हा माणसं जोडणारा सेतू असतो. असायला हवा.

पण खरोखरीच आपले बोलणे ऐकणाऱ्यापर्यंत पोचते का? कळीचा मुद्दा आहे ना हा? आपण बोलतो... बोलतच राहतो. पण आपला आवाज, आपले शब्द ऐकणाऱ्याच्या मनापर्यंत पोचतात का? भिडतात का? का त्या फ त ‘तोंडाच्या वाफा’च ठरतात ? आपले बोलणे कधी कधी पोचते ऐकणाऱ्या पर्यंत; पण बऱ्याचदा.... ‘इकडून तिकडे गेले वारे’, असे तर होत नाही ना?

जरा तपासून पाहा बरं –

१) आपलं बोलणं, संदेश आपल्याला नीट पोहोचवता आला नाही किंवा अर्धवट पोहोचला का ?

२) संवाद गैरसमज, संशय, पूर्वग्रह निर्माण करणारा तर नाही ना?

३) संवाद प्रभावहीन तर नाही ना?

४) चुकीच्या उच्चाराने अनर्थ नाही ना झाला?

५) हळू आवाजाने, तुटक, तोंडातल्या तोंडात बोलल्याने आपले शब्द हवेतच विरून गेले का?

६)बऱ्याचदा आपण चाचरत, आत्मवि ास नसल्यासारखं बोलतो का?

७) आपलं बोलणं पुस्तकी आहे का?

८) आपण बोलताना खूप अवघड शब्दांचा वापर करतो का?

९) आपलं बोलणं संदिग्ध, संदर्भाला सोडून, पाल्हाळीक आहे का?

वरील प्रश्नांची उत्तरं होकारार्थी येत असतील तर हे सगळं टाळायला हवं. म्हणजे मग आपल्याला समोरच्याशी सहज संवाद साधता येईल. औपचारिक प्रसंगी फार अघळपघळ बोलू नये. साधं, सहज, स्पष्ट, आवश्यक तेवढ्या मोठ्या आवाजात, बोलीभाषेत, अकृत्रिम बोलणं किती छान असतं; पण बऱ्याचदा सोप्या गोष्टीच अवघड होतात.

सहज, अकृत्रिम संवाद साधण्यासाठी खालील मुद्दे महत्त्वाचे ठरतात.

संवादाचा हेतू: संवादाचा हेतू काय आहे, त्यानुसार भाषा निवडावी. म्हणजे निरोप द्यायला आलात, की माहिती द्यायला? गप्पा मारायला आलात, की चौकशी करायला? चर्चा करायला आलात, की जाब विचारायला? संवादाचे कारण स्पष्ट असले, की शब्द स्पष्टरूप घेऊ लागतात. आपण कुणाशी बोलतोय त्यावरही भाषेची निवड अवलंबून आहे. म्हणजे मैत्रिणीशी हसतखेळत बोलावे, शिक्षकांशी नम्र व मोजके. दुकानात स्पष्ट आणि रोखठोख तर नातलगांशी प्रेमाने आणि आदराने बोलावे. मात्र, अतिस्पष्टता कधीकधी घातक ठरु शकते. स्पष्टतेला गोड, सौम्य शब्दांचे आवरण दयावे.

तुटे वाद, संवाद तेथे करावा । मनीचा भाव अलगद पोचावा ।।

भेट द्या : **दूधवा राष्ट्रीय उद्यान** – उत्तरप्रदेश, क्षेत्रफळ ४९०.३ चौ. किमी., वाघांसाठी संरक्षित, बारशिंग्यासाठी प्रसिद्ध

स्वावलंबनातून आत्मवि ास, धडपडीतून आनंद, **‘छात्र प्रबोधन’** वाचून लागतो या साऱ्याचा छंद.

स्पष्टता उद्धटपणाकडे झुकू नये. भाषेत सौम्यता, गोडवा असावा. पण लाडेलाडे बोलणे नको. शब्दांची योग्य निवड करावी आणि आपला सूर, हेल, वाचिक उच्चार, हावभाव सुसंगत असावा. योग्य ठिकाणी अर्थपूर्ण विराम घ्यावा.

शब्दांची योग्य निवड : शब्द उच्चारताना त्याचा अर्थ आपल्याला माहीत आहे ना, ते ताडून मगच उच्चारावा. तो शब्द योग्य आहे ना, त्याने माणूस संभ्रमात पडणार नाही ना, दुखावणार नाही ना, त्यातून गैरसमज होणार नाही ना, ह्याचा विचार करून मगच बोलावे.

आपण काही उदाहरणे पाहू –

कृतज्ञतेची भावना पोहोचवण्यासाठी 'मी तुमचे धन्यवाद मानतो' अशी हमखास वा यरचना योजिली जाते. त्याऐवजी 'मी तुमचे आभार मानतो किंवा तुम्हाला धन्यवाद देतो ' अशी शब्दयोजना हवी.

'त्या घटनेने माझ्यावर हल्ला केला' – नव्हे आघात केला, वाईट परिणाम केला, हादरवलं...असं काही हवं.

बोलताना अर्थाचा अनर्थ होऊ देऊ नये. शब्दाचा अर्थ माहीत नसेल तर अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. 'आजी देवघरात गेली' ऐवजी 'आजी देवाघरी गेली' म्हटले की अनर्थ होतो. 'सर्वांनी मतदान करावे असे मी *आव्हान* करतो,' इथे '*आवाहन*' हवे, नाही का?

आपले म्हणणे नीट पोचण्यासाठी म्हणी, वा प्रचार वापरावेत. पण त्यांचा अतिरेकही नको आणि अयोग्य वापरही टाळावा. गुंतागुंतीचे, अनाकलनीयही बोलू नये. शब्दांची पुनरु तीही टाळावी. शब्दबंबाळ, गुंतागुंतीचे, खूप विश्लेषण असलेले, लांबलचक वा य बोलले तर ऐकणाऱ्याचा गोंधळ होतो. ऐकणाऱ्याला जर काही बोध होणार नसेल तर त्या तोंडच्या वाफांचा उपयोग काय?

संमिश्र भाषेचा वापर टाळावा : आपल्या भावना व्य त करण्यासाठी श यतो एकाच भाषेचा वापर करावा; कारण प्रत्येक भाषेचा लहेजा, व्याकरण हे वेगळे असते. इतर भाषेतील मराठीत रुळलेले शब्द जरूर वापरावेत उदा. टेबल. टेबलाला मराठीतील 'मेज' हा शब्द कदाचित बोलताना कृत्रिम वाटू शकेल.

योग्य उच्चारण : बोलताना आपले उच्चार सुयोग्य हवेत. भाषा खूप लवचीक असते मित्रांनो. आपल्या जिभेला तिचे वळण लावावे लागते. 'हसा' व 'हशा'यात फरक आहे. 'खून' आणि 'खूण' यांचा उच्चार नीट करा नाहीतर होईल पंचाईत. 'खुली' म्हणजे उघडी आणि 'खुळी' म्हणजे 'वेडी' बरंका! 'भाषा' मधला 'षा'चा उच्चार आणि 'दिशा' मधल्या 'शा' चा उच्चार वेगळा कसा, हे तुम्ही भाषाशिक्षकांकडून जाणून घ्या. 'दिन' म्हणजे दिवस पण 'दीन' म्हणजे गरीब हे तुमच्या उच्चारातून दाखवा.

काही शब्द आवर्जून टाळावेत : 'अंधळा' ऐवजी 'अंध' किंवा 'दृष्टिहीन' म्हणावे. 'सेवक' ऐवजी 'मदतनीस' म्हणावे. 'म्हातारा' ऐवजी 'वृद्ध', 'ज्येष्ठ' म्हणावे. बाई, बायका ऐवजी स्त्री, महिला असे सभ्य शब्द योजावेत. यामुळे व्य तीचा आदर ठेवला जातो. संवादात सकारात्मकता वाढते.

योग्य देहबोली : आपला आविर्भाव, देहबोली योग्य आणि सौम्य असावी. अति हातवारे करत बोलू नये. संयमाने, तरी स्पष्ट बोलावे. देहबोलीच्या संदर्भात अधिक विस्ताराने आपण पुढील अंकात पाहणार आहोत.

हे सगळे तुम्हाला केव्हा जमेल? जेव्हा तुम्ही बोलाल, व्य त व्हाल तेव्हाच. तुम्ही एकमेकांशी बोला, तुम्ही चर्चा करा किंवा भाषण करा; पण प्रत्येक प्रसंगी शब्दांचा, बोलण्याचा, भाषेचाही सराव करा. विचारांती बोला.

आपण स्पष्ट तरी सौम्य, मोजके पण नेमके, नि:संदिग्ध आणि परिणामकारक बोलू शकलो, की आपल्या संवादाचा हेतू साध्य होतो. समोरच्या व्य तीच्या चेहऱ्यावर समजल्याचे भाव उमटले आणि तिने त्यावर प्रतिक्रिया दिली, की संवादाची श्रृंखला होते. आपले म्हणणे ऐकणाऱ्याच्या कानातून मेंदूपर्यंत पोचले आणि त्याच्या मनाला भिडले, मनात नोंदवले गेले की संदेशवहनाचा प्रवास सुरू होतो. आपण सारेच त्याचे प्रवासी. तो प्रवास सुंदर, सार्थ आणि रम्य व्हावा म्हणून.... 'बोलू आनंदे'

– आश्लेषा महाजन,
'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर क्र. १, पुणे 411009

संवाद म्हणजे केवळ प्रभावी शब्दफेक नव्हे, संवाद म्हणजे प्रभावी श्रवणही !।।

भेट द्या : कांचनझुंगा राष्ट्रीय उद्यान – सि कीम, क्षेत्रफळ १७८४ चौ. किमी., हिमालयीन प्राण्यांसाठी प्रसिद्ध

जिद्द, साहस, रंजकता यांचा मेळ भारी, **'छात्र प्रबोधन'** सवे घेऊ उंच भरारी.

सुट्टीतील वेगळा अनुभव...

दहावीची परीक्षा झालेल्या काही विद्यार्थ्यांनी 'आम्हाला छात्र प्रबोधनमध्ये येऊन काम करण्याचा अनुभव घ्यायचाय', असं उत्स्फूर्तपणे सांगितलं. एवढ्यावरच ही मंडळी थांबली नाही तर सातत्याने रोज चार तास येऊन त्यांनी मनापासून काम करायसा सुरुवातही केली. मासिकाचे लेखन, संपादन , संगणकाद्वारे छपाई कशी होते हे जवळून बघितले. विभागातील सदस्यांच्या सहवासातून –निरीक्षणातून या विद्यार्थ्यांचं शिकणं,अनुभवणं. प्रगल्भ होणं चालू आहे. वाचूया त्यांचे अनुभव...

सुट्टीत काहीतरी वेगळं करण्याची मला खूप इच्छा होती आणि म्हणूनच मी ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' विभागात कामाचा अनुभव घेण्यासाठी आले. छात्र प्रबोधनमधील अंकातून अनेक नवीन व चांगल्या लेखमाला-कथा-कविता-ललित माझ्या वाचनात आल्या. त्यामुळे मराठी भाषेकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन खूपच सकारात्मक झाला. या विभागातलं खेळी-मेळीचं वातावरण, सर्वच ताईंकडून मिळणारा पाठिंबा यामुळे मी या विभागाची कधी होऊन गेले माझं-मलाचं कळलं नाही. विभागातील सदस्यांची कामाविषयीची श्रद्धा पाहून मलाही अधिकाधिक काम करण्याची स्फूर्ती मिळाली. मग ते काम स्फुटांचे वर्गीकरण असो वा तळटिपेतल्या ओळींविषयीचं असो ! अशी विविध कामं करण्याची संधी मला मिळते आहे. मी अनुभवसमृद्ध होत आहे.

– **गिरिजा कानडे,** (इ.बारावी), बिबवे वाडी, पुणे

***

'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेचं 'छात्र प्रबोधन' हे मासिक मी वाचत असतो. मासिकात माझे दोन लेखही छापून आले आहेत. मासिकाच्या कामाबाबत खूप उत्सुकता होती. संपादकांची परवानगी घेतली आणि दहावीच्या सुट्टीत या विभागात मासिकाच्या कामाचा प्रवास पाहायला, येथील कामाचा अनुभव घ्यायला मी येऊ लागलो. चालू अंकाच्या साहित्याची संगणकाद्वारे छपाई, लेखांचे संपादन, लेखांना चित्र लावणे इ. जवळून बघता आले. मुलांनी तयार केलेली हस्तलिखिते बघणे, त्याची *सीडी* करून ठेवणे, *पीपीटी डाऊनलोड* करणे, अंकातील स्फुटं वाचून त्याचे वर्गीकरण करणे अशी कामे करताना मजा आली. खूप वेगळा अनुभव मिळाला. नवीन गोष्टी, नवीन तंत्रे शिकायला मिळतायंत. विभागातील सदस्यांशी (ताईंशी) बोलण्याचं, विभागाच्या शिस्तीत काम करण्याचं शिक्षणच मला मिळतंय. असा अनुभव प्रत्येक मुलाने घ्यायलाच हवा, असं मला वाटतं.

– **रूचिर कुलकर्णी** (इ.दहावी), सहकारनगर, पुणे

***

काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव केवळ अविस्मरणीय. आम्ही येथे अनेक गोष्टी शिकत आहोत. पुस्तक विक्री, त्यांचा हिशोब, पत्रे लिहिणे, पत्रात वापरण्याची अलंकारिक भाषा, मासिकांचे 'पोस्टिंग', तिकीट लावणे इ. असंख्य गोष्टी केल्या. हे अनुभव यापूर्वी कधीच घेतले नव्हते. ती कामे करताना धम्माल मजा आली. पुस्तकांचा स्टॉक घेण्याचे काम सोपे होते पण वेळखाऊ होते; तरी आम्ही चिकाटीने ते काम पूर्ण केले. प्रत्यक्ष संपादकांबरोबर काम करण्यास तर खूप मजा आली. एकंदरीतच आम्ही अनेक अंगांनी समृद्ध झालो ते केवळ या कार्यानुभवामुळेच. शिवाय इथे झालेल्या ओळखी तर दीर्घकाळ टिकणाऱ्या असतील यात दुमत नाही.

– **श्रीरंग टोके,** (इ.दहावी), सहकारनगर, पुणे **कौस्तुभ जोशी** (इ.दहावी), धनकवडी, पुणे

***

ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन' विभागात 'कार्यानुभव' हा आगळा-वेगळा उपक्रम चालतो; हे समजल्यावर मी 'छात्र प्रबोधन'शी संपर्क साधला. संपादकांशी बोलून मी रोज चार तास इथे काम करायला येऊ लागले. सुरुवातीला माझ्या आवडीचे चित्र काढण्याचं काम मला मिळालं. छात्र प्रबोधनच्या सभासदांसाठी वाढदिवसाची पत्रं सुवाच्च अक्षरात लिहिली. त्या पत्रांवर छोटी-छोटी चित्रं काढली. त्यानंतर जी गोष्ट करण्याचा मी कंटाळा करते, ते म्हणजे वाचन; तेही करू लागले. हळूहळू वाचनाची आवडही निर्माण होत आहे. छात्र प्रबोधनचे १२ महिन्यांचे खंड बघितले. कथा-कविता-लेख यांचं वाचन केलं. संगणकावरची, अंकांची कामं करताना खूप शिकायला मिळतंय आणि मजाही येत आहे.

– **सानिका कुलकर्णी** (इ.दहावी)

***

देह मानवी लाभला आहे, त्याचं चीज करायचं। काळावर नाव कोरल्याशिवाय, उगाच नाही मरायचं।।

भेट द्या : कान्हा राष्ट्रीय उद्यान – मध्यप्रदेश, क्षेत्रफळ १४० चौ. किमी., वाघांसाठी व बारशिंग्यासाठी प्रसिद्ध

सर्व दिशांनी विकसित होवो, हाच आहे ध्यास, **'छात्र प्रबोधन'**च्या वाचनाने, लाभो सद्गुणांचा सहवास.

DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

टोल फ्री: १८०० २३३ १७००
मधुकुंज, प्लॉट क्र. पी-५२, एम.आय.डी.सी. फेज- २, कल्याण शीळ रोड,
सोनारपाडा, डोंबिवली (पू)- ४२१२०४ ☎०२५१- २८७५००० ते २८७५००९
ई-मेल: enquiry@dnsb.co.in वेबसाईट: www.dnsbank.in

गगनभरारी घेत दिशांचे, हात हाती घेऊ। उजेडवेड्या आकांक्षांचा, सूर्य आम्ही पाहू।।

भेट द्या : राधानगरी अभयारण्य – महाराष्ट्र, इ. स. १९५८, क्षेत्रफळ ३५१.१६ चौ. किमी., गव्यांसाठी प्रसिद्ध

'छात्र प्रबोधन'च्या रूपाने मंत्र आम्हा लाभला, यशस्वी होण्याचा चंग आम्ही बांधला.

एक आगळा-वेगळा अनुभव

– अर्चित देवधर

'हाय' मी अर्चित देवधर. मी एस.पी.एम. इंग्लिश स्कूल मध्ये सातवी त आहे. ही झाली माझी औपचारिक ओळख. पण खरं सांगू का? मला तुमच्याशी मोकळेपणाने गप्पा मारायच्या आहेत आणि तुमच्याशी खूप काही *शेअर* करायचं आहे.

माझ्या शाळेत अभ्यासाबरोबरच फाईन आर्टस् सुद्धा आहे. यामध्ये गायन, वादन, नृत्य व अभिनय या चार कलांशी आमची ओळख करून देतात. माझा विषय नाट्यशास्त्र (Dramatics) हा आहे. इ. पहिलीपासून हाच विषय असल्यामुळे निरनिराळ्या नाटकाच्या स्पर्धांमधून मी भाग घेत आहे. यातूनच रंगमंचाची थोडीफार सवय झाली होती. अभिनय म्हणजे काय हे थोड्या प्रमाणात उमगायला लागलं होतं.

जून २०१३ मध्ये माझ्या शाळेत काही लोक आले. नाट्यशास्त्राच्या मुलांशी त्यांनी गप्पा-गोष्टी केल्या. आमच्या शाळेतील ८ जणांना त्यांनी *ऑडिशन्स* साठी *FTII (Film and Television Institute of India)* मध्ये बोलावलं. इतरही शाळांमधील मुलं *ऑडिशन्स* साठी आली होती. जवळ जवळ १ आठवडा आमच्या *ऑडिशन्स* चालू होत्या. *शॉर्ट लिस्ट* होत होत शेवटी आम्ही १० मुलं राहिलो . त्यानंतर १ आठवडा आमची नाट्य कार्यशाळा झाली. मग मला समजलं की माझी निवड 'किल्ला' या मराठी चित्रपटाच्या प्रमुख भूमिकेसाठी झाली आहे.

आता थोडंसं चित्रपटाबद्दल सांगतो. ही गोष्ट चिन्मय काळे नावाच्या इ. सातवीतील मुलाची आहे. यात मी चिन्मय काळेची भूमिका केली आहे आणि अमृता सुभाष हिने अरुणा काळे म्हणजे माझ्या आईची भूमिका केली आहे.

तर चिन्मयच्या बाबांचं साधारण १ वर्षापूर्वी निधन झालेलं आहे. तो आणि आई दोघं त्याच्या मामाकडे रहात आहेत. एक दिवस चिन्मयच्या आईला नोकरीत बढती

किल्ला चित्रपटातील एक दृष्य

मिळून गुहागर या गावी तिची बदली होते. चिन्मयला पुणे सोडून अजिबात जायचं नसतं. त्याला गुहागर अजिबात आवडत नाही. पण मग हळूहळू त्याला नवीन मित्र मिळतात. तो त्यांच्याबरोबर जमवून घेऊ लागतो आणि त्याला सगळं आवडू लागतं. सगळं काही सुरळीत चालू असतं आणि एक दिवस त्याच्या आईची परत बदली झाल्याचं त्याला समजतं. परंतु यावेळेला चिन्मय हे समजून घेतो की, आता आपल्याला बदलीमुळे असंच नवीन गावी जावं लागणार आहे. अशाप्रकारे आई-वडिलांच्या बदलीचा परिणाम नकळत मुलांवर कसा होतो, ते या सिनेमातून दाखवले आहे.

शुटिंगचा पहिला दिवस... एखाद्या लगिनघाईचं वातावरण तेथे होतं. वेशभुषेच्या सामानाच्या मोठ्या मोठ्या पेट्या होत्या. कलाकारांची तयारी चालू होती. एकीकडे सकाळचा नाश्ता होता. तर दुसरीकडे मेकअप, कॅमेरा, लेन्स, लाईटची व्यवस्था या सर्व तांत्रिक गोष्टींची जुळवाजुळव चालली होती. पण खरं सांगू, मला या कशाचंच दडपण आलं नव्हतं. आजूबाजूचं वातावरण, माणसं यांच्यात मी मिसळून गेलो होतो. मला खूप मजा येत होती. असे अनेक अनुभव घेता घेता चित्रपट कधी पूर्ण झाला ते मला कळलंच नाही.

जानेवारीमध्ये आम्हाला समजलं की आमची ही

आकांक्षांच्या लाटांवरती, घेऊनी हिंदोळे। क्षितिजालाही जाऊनिया मी, कितीदा तरी भिडले।।

भेट द्या : पेंच राष्ट्रीय उद्यान – मध्यप्रदेश, क्षेत्रफळ ७५८ चौ. किमी., वाघांसाठी संरक्षित व चितळांच्या प्रचंड संख्येसाठी प्रसिद्ध

फिल्म *Generation K plus* हया *catagory* मधून *Berlin International Film Festival* मध्ये निवडण्यात आली आहे. आम्हा सगळ्यांना खूप आनंद झाला. आणि आमची बर्लिनला जायची तयारी देखील सुरू झाली.

११ फेब्रुवारीला चित्रपटगृहात 'किल्ला' चा *world premiere* झाला. पाच शाळांमधील मुले आणि त्यांचे आई-वडील असे हा चित्रपट पाहाण्यासाठी आले होते. सिनेमामध्ये इंग्लिश *sub titles* दिसत होती परंतु Germany मध्ये इंग्लिश कोणालाच येत नसल्याने त्याला *live German Voice over* होता. म्हणजे एक महिला संपूर्ण सिनेमाचे स्क्रीप्ट जर्मन भाषेत वाचत होती.

बर्लिनचा हा अनुभव माझ्यासाठी एक खूप मोठी पर्वणीच होता. तिथे त्यांनी माझे खूप कौतुक केले. आणि विशेष म्हणजे आमच्या फिल्मला *Best film* चे पारितोषिक मिळाले. शिवाय *International Jury's Special Mention Award* सुद्धा मिळाले.

या आधी बर्लिन चित्रपट महोत्सवात झळकण्याचा मान फ त दोनच मराठी चित्रपटांना मिळालेला आहे. सामना (१९७५) व विहीर (२००६) त्यातच एखाद्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एकाच वेळेला २ पुरस्कार पटकावलेला हा पहिलाच भारतीय चित्रपट आहे.

यात निश्चितच 'किल्ला' च्या संपूर्ण गटाचं खूप मोठं योगदान आहे. या चित्रपटाच्या यशात माझाही छोटासा वाटा आहे याचा मला अभिमान आहे.

अर्चित देवधर
चंद्रगंगा, प्लॉ. नं. ५, कुलश्री कॉलनी, कर्वेनगर, पुणे - 52

प्रतिसादी वाचकवीर व्हा... २

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. मागील महिन्याच्या वासंतिक अंकापासून अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या अंकात देत आहोत. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३० जून २०१४ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आंनद मिळवाल, असा विश्वास आहे.

१. 'प्रतिमा उदंड झाल्या' या लेखात निसर्ग व पर्यावरण संवर्धनासाठी फोटो प्रदर्शनांचा उपयोग कशाप्रकारे करता येईल, असे लेखकाला वाटते?
२. 'चौसष्ट घरांचा विश्वसम्राट' या लेखात बुद्धिबळ खेळाला पोषक असे कोणते स्वभावगुण आनंदकडे आहेत?
३. तुमच्या सोसायटीच्या गणेश उत्सवाची जबाबदारी तुम्हा कुमारगटावर सोपवलेली आहे, अशी कल्पना करा. त्या उत्सवाचे आयोजन-नियोजन तुम्ही कसे कराल; ते शब्दबद्ध करा.
४. मलपृष्ठाच्या आतील पानावर टोपण, कात्री यांसारख्या वस्तू वापरून काही कलाकृती दिल्या आहेत. अन्य दोन वस्तूंचा कल्पकतेने वापर करून तुम्ही अशाच काही कलाकृती बनवा. त्यांचे फोटो छात्र प्रबोधनला इ-मेल करा.
५. 'थ-थव्याचा' या लेखात बाराखडीच्या त त्यात माणसांच्या थव्याऐवजी बगळ्यांचा थवा दाखवावा, असे लेखक का सुचवतो?
६. मुखपृष्ठ पाहून तुमच्या मनात कोणत्या भाव-भावना निर्माण झाल्या त्या सुमारे ८ ते १० ओळीत लिहा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९३६, १ मे २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.



अशी ही कल्पकता !!!



सौर वैशाख, शके १९३६/मे २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ वैशाख, शके १९३६ /१ मे २०१४
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 / 2012 - 2014,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP- 21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month

वळणदार वाट, झाडी घनदाट !!

हा रस्त्याचा फोटो पाबे घाटात काढला आहे. यामध्ये उन्हामुळे जी झाडांची पाने गळतात, त्यामुळे रस्त्याच्या कडेला त्या पानांची किनार तयार होते. ती पानांची किनार तसेच रस्त्याचे वळण टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

– योगेश बोकिल, yogeshbokil@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

सौर दिनदर्शिका शके १९३६

	मे २०१४	वैशाख ज्येष्ठ
गु.	1	११
शु.	2	१२
श.	3	१३
र.	4	१४
सो.	5	१५
मं.	6	१६
बु.	7	१७
गु.	8	१८
शु.	9	१९
श.	10	२०
र.	11	२१
सो.	12	२२
मं.	13	२३
बु.	14	२४
गु.	15	२५
शु.	16	२६
श.	17	२७
र.	18	२८
सो.	19	२९
मं.	20	३०
बु.	21	३१
गु.	22	ज्ये.१
शु.	23	२
श.	24	३
र.	25	४
सो.	26	५
मं.	27	६
बु.	28	७
गु.	29	८
शु.	30	९
श.	31	१०

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–

प्रति –

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.